नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुररस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
दुर्मिळ ग्रंथ संपदा

संपादक
बा. ना. देशपांडे

डिसेंबर-१९४८] ★ [किंमत ८ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता—
वामन नारायण देशपांडे
संपादक 'युगवाणी'
टिळकवाडी, यवतमाळ (वऱ्हाड).

युगवाणी

व्यावसायिक पत्रव्यवहाराचा पत्ता—
द. ना. ठाकूर,
महेश्वर प्रेस, मुधोळकर पेठ,
अमरावती (वऱ्हाड).

अनुक्रमणिका

★

१	मी (कविता)—गु. ह. देशपांडे	३५९
२	वाटसरास (कविता)—द. चिं. सोमण	३६०
३	कधीं एकाएकीं (कविता)—ना. ग. जोशी, एम्. ए.	३६१
४	जीवनवेणु (कविता)—प्रा. मधुकर नाईक, एम. ए.	३६२
५	कवि विरागी—कॅ. डॉ. रा. चिं. श्रीखंडे, एम्. बी. बी. एस्.	३६३
६	काव्याचें जीवनांतील स्थान—प्रा. पु. शि. रेगे, बी. एस्सी.	३७०
७	रेबेका—शरच्चंद्र टोंगो, बी. ए.	३७२
८	संपादकीय	३८७
९	संघवार्ता	३८९

●

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

युगवाणी

मी

गुणवंत हनुमंत देशपांडे

मी नाही ग मी नाही
नव्हतों मी केव्हांही !

होतें नव्हतें कांही जेव्हा
असेन कैसा मीही तेव्हा ?
माझीच मला स्मृति नाही ! १

असेंच होतें तेथे असणें
तेथे सजलें तुझें तूंपणें
ही तुझीच की चतुराई ! २

तुवा निर्मिलें माझें मीपण
तुझेंच मजला निमित्त कारण
ही तुझ्यांतली नवलाई ! ३

तूं नसतां मी नसे अपैसें
असणें–नसणें मजला कैचें !
मज अपेक्षाच मुळि नाही ! ४

★

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाटसरास—

द. चिं. सोमण

शीतल वाहे पहाट—वारा
विझूं लागल्या अवघ्या तारा !

पुसट हळुहळू हो नभ-गंगा
धवल रंग ये कृष्णघनांगा
शुक्र-तारका-प्रभा पसरली
क्षितिजावरती किति रुचिरा.

रजनी जाई लपवित वदना
आवरीत निज भीषण वसना
घूक—गान ना येई कानीं
अशुभा आता नच थारा.

किलबिल किलबिल सभोवतालीं
मंगल मंजुल सुरूं जाहली
जरी न अजुनी झाली पुरती
क्रम-नियमें तम—मुक्त धरा.

तरिही बससी उदासवाणा
शेषच उरली अवस-रात्र ना ?
भास्कर—किरणें चार क्षणांनी
दावितील तुज पथ सारा.

नच आकाशीं कलंकित शशी
न्यून तेंच का खुपे मानसीं !
विधु विटलेला हवा कशाला
करीं जरि अता वाटसरा !

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

' कधी एकाएकीं— ! '

★

ना. ग. जोशी, एम्. ए.

कधी एकाएकीं होतसे आभास ।
मन हो उदास । दीनवाणें

वाटतें रुंदावे घुमट नभाचा ।
आधार विश्वाचा । ढासळे की

आणि अंधारांत वाढते पोकळी ।
विशाल वर्तुळीं । विस्तारते

तेथे चाचपडे जीव वेड्यापरी ।
आर्त नाद उरीं । घुमतसे

न ये पडसाद कुठूनीहि कांही ।
रडे धाई धाई । परी मूक !

तंव तुझी मूर्ती स्वप्नीं न्याहाळिली ।
जीवींची निमाली । व्याकुळता

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जीवन-वेणु

प्रा. मधुकर नाईक, एम्. ए.

जीवन-वेणू ही घुमते !

दिगन्ति भरल्या काल-सैकतीं
सान-थोर पाउलें उमटतीं
आणि पुसटुनी जाती नूतन जइं पदतति उमटे ! १

सैकतावरी त्या रात्रंदिन
चराचरांच्या घुमति उरांतुन
सूर एक हे जीवन-वेणू ही ज्यांमाधे रमते ! २

परिस्थितीचा वारा कोंडुनि
सुखदु:खांच्या दोन करांनी-
बसुनी अज्ञातांत कुणी ही वेणू नादविते ! ३

कधि आशांची फुलवित स्वप्नें
कधि भासांचीं उघळित रत्नें
कधी निराशा, कधी जागृति वर्षित दुमदुमते ! ४

स्वर प्रेमाचे, स्वर द्वेषाचे
स्वर क्रौर्याचे, अनुकंपेचे
उठति वेणुंतुन अशीं विविध या क्षणक्षण संगीतें ! ५

पदें उमटतीं, पुसट्टानि जातीं
मर्मर-ध्वनि हो काल-सैकतीं
आणिक वरती वेणूंतुन या स्वरमाला फुलते ! ६

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कवि विरागी

(प्रा. गणेश श्रीपाद हुपरीकर, एम्. ए., बी. टी.)

कॅप्टन् डॉ. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे, एम्. बी. बी. एस्.

● कोल्हापूरचे सत्कवि ' विरागी ' यांचा हा सुंदर परिचय त्यांचे मित्र सत्कवि डॉ. श्रीखंडे यांनी लिहिला आहे.

★

" ताल्वादियत्नसाकाङ्क्षवाग्विलम्बभयादिव ।
द्रुतमास्रैः स्तुवन्सूक्तिं जीयात् सहृदयो जनः ॥ १ ॥

पूर्णसरस्वती ' विद्युल्लता ' टीका.

सारांश—सत्कविता ऐकतांच होणारा आनंद शब्दांनी व्यक्तविण्यास तालु, जिव्हा, दन्त इ. च्या सहेतुक विशिष्ट हालचालींना लागणाऱ्या विलंबाच्या भीतीमुळेच, जणू काय, तत्काल ओघळणाऱ्या अश्रूंनीच जो त्या सूक्तीची स्तुति करतो, तो सहृदय रसिकवर्य विजयी असो ! (मेघसंदेशाच्या आपल्या ' विद्युल्लता ' नामक सुप्रसिद्ध टीकेच्या प्रस्तावांत पूर्ण सरस्वतीने सहृदयाची प्रशंसा करतांना वरील उद्गार काढले आहेत.)

कोल्हापूर येथील राजाराम हायस्कूलमधील माझे एका काळचे वर्गबंधु व नंतरचे सुहृद्वर्य प्रा. गणपतराव हुपरीकर यांचा परिचय ' युगवाणी 'च्या वाचकांसाठी करण्याचें कार्य रसिक संपादकांनी मजवर आग्रहपूर्वक सोपविल्यावरून मी विचार करूं लागलों, तों मला प्रथमच आनंदाची ही गोष्ट दिसून आली की आमच्या इकडच्या ' उद्योग, उत्साह व उन्नति आणि साहित्यप्रगति ' यांच्या प्रीत्यर्थ प्रामुख्याने कांकण बांधून झटणाऱ्या इकडील निकटवासी संपादक महाशयांनाहि ज्यांच्या विषयीं परिचयलेख आतापर्यंत लिहवून प्रसिद्ध करण्याची आवश्यकता एवढीशी देखील वाटलेली दिसून येत नाही, त्या उपेक्षित विद्वानांच्या योग्यतेनुरूप कांहीं लिहून त्या पंडितांच्या गुणगौरवाची संधि आपणच प्रथम साधावी, ही हार्दिक मनीषा या वैदर्भी ' युगवाणी 'च्या संपादकांच्या ठायीं उत्कटत्वाने वसत आहे.

' कवीच काव्यें गवईच गाणें '
दुःखीच कांही परदुःख जाणे

म्हणतात, त्याप्रमाणे, संपादकांतच थोर कवित्व व विद्वत्व असल्यामुळेच या गुणांचा

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

योग्य पारख त्यांजकडून होत आहे. संपादक झाल्याकारणाने जो 'विद्वान्' म्हटला जातो, तो निराळा व विद्वान् असल्यामुळे जो संपादक शोभला, तो निराळा! पुष्कळसे संपादक 'विद्वान् सर्वत्र पूज्य, ते!' या कोटींतले असतात, असें खेदयुक्त विनोदाने म्हटल्यावाचून राहवत नाही! प्रस्तुत कोटीबद्दल बहुसंख्य संपादकांचा रोष मी मजवर ओढवून घेईन, ही भीति नाहीं. कारण, ही खोच कळण्याइतपत ते खरोखर विद्वान् असल्यास खात्रीनेच रागावणार नाहीत!! असो.

आणि, तसें पाहिलें, तर आमचे गणपतरावजी हुपरीकर हे कंपूशाही व प्रसिद्धीची अनावर लोलुपता या बऱ्याचशा तथाकथित 'प्रसिद्ध' व्यक्तींत आढळून येणाऱ्या सद्गुणांपासून वा दुर्गुणांपासून, कांहीहि म्हणा, अगदी अलिप्त आहेत. इतके की, त्यांचें कविनाम जें 'विरागी' तें त्यांच्या वृत्तीस अतिशय शोभून दिसतें! त्यांचें लिखाणहि कांही कमी नाही. 'मधुसंभार' हा स्फुट कवनांचा त्यांचा संग्रह प्रसिद्ध होऊन १० वर्षे झालीं. त्यानंतरचा त्यांचा 'अभिसार' नामक स्फुट कविता संग्रह अद्याप अप्रकाशित आहे. या काव्यक्षेत्राखेरीज निबंध, समीक्षा, वाङ्मयचर्चा— इत्यादि विविध प्रकारचें त्यांचें विपुल लिखाण व तेंहि मौलिक विचारांनीं भरलेलें असें अनेक ठिकाणीं प्रसिद्ध झालेलें आहे. तें सर्व एकत्र केल्यास एका उत्तम साहित्यग्रंथाची भर मराठी वाङ्मयांत पडल्यावाचून रहाणार नाही, अशाच योग्यतेचें व तोलाचें तें आहे. याशिवाय त्यांचा विशेष व्यासंग म्हणजे प्राचीन संस्कृत वाङ्मय-विशेषतः वेदान्त, साहित्य व व्याकरण या शास्त्रांचा होय. वेदांताचा त्यांचा अभ्यास सखोल व थोर परंपरेने त्यांस प्राप्त झालेला व त्यांनी स्वतः अतिशय आस्थेने व परिश्रमाने संवर्धित केलेला असा आहे. याच्याच जोडीस म्हणजे संस्कृत शास्त्रीय ग्रंथाबरोबरच श्री ज्ञानेश्वरांच्या 'भावार्थ दीपिका' व 'अनुभवामृत' इत्यादि ग्रंथांचाहि दृढभक्तिपूर्वक गाढा अभ्यास विरलसपणे गणपतरावांनी केलेला आहे व अजून चालविलेला आहे. प्राचीन वेदान्तग्रंथ पढणारे संस्कृततज्ज्ञ प्रायः संत-वाङ्मयाविषयीं जी अढी बाळगतात, ती तर यांच्या ठायीं बिलकूल नाहींच; उलट, अत्यंत थोर हार्दिक श्रद्धा व आस्था व तदनुरूप 'ज्ञानेश्वरी' इ. ग्रंथांचा डोळस अभ्यास करण्याची प्रवृत्ति प्रा. हुपरीकर यांचे ठिकाणीं जी आहे, ती असामान्यच होय!

अलीकडे त्यांनी 'संस्कृतानुशीलन विवेकः' किंवा 'The Problem of Sanskrit Teaching' हा मोठाच ग्रंथ लिहिला असून तो छापूनहि तयार आहे व लवकरच प्रसिद्ध होईल. हा सुमारें ७०० पृष्ठांचा असून त्यांत पहिला सुमारे १०० पृष्ठांचा भाग केवळ संस्कृतज्ञांसाठी म्हणून संस्कृतांतच त्यांनी लिहिला आहे व बाकीचा सर्व ग्रंथ इंग्रजींत आहे. हा ग्रंथ थोर परिश्रम गाढ विद्वत्ता व उत्कट संस्कृतभाषाप्रेम या गुणांचा द्योतक ठरल्यावाचून रहाणार नाही. या ग्रंथास महा-महोपाध्याय प्राचार्य वा. वि. मिराशी या विद्वानांची प्रस्तावना लाभण्याचा बहुतेक संभव असून लवकरच हा ग्रंथ प्रकाशित होईल. या ग्रंथाने प्रा. हुपरीकर यांस चिरकीर्ति व विद्वन्मान्यता लाभल्यावाचून खास राहाणार नाही व गेलीं १० वर्षे त्यांनी ज्या विषयांचा उत्कटतेने अभ्यास केला, त्याचें फल या सद्ग्रंथ रूपाने आप-णांस लाभल्याबद्दल संस्कृतप्रेमी वाचकवर्ग त्यांचा ऋणी झाल्यावाचूनहि खास राह-णार नाही.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उपरिनिर्दिष्ट वाङ्मयीन कृतींवरून प्रा. गणपतराव यांच्या विषयीं महाराष्ट्रीयांस अवश्यमेव थोर अभिमान वाटेल, यांत संशय नाहीं. त्यांच्या कृतींचें यथार्थ समालोचन करण्याचें कार्य महत्त्वाचें, तसेंच, उद्‌बोधकहि होईल. प्रस्तुत लेख मर्यादेंत तें सामग्र्याने सामावणें अशक्यप्राय होय. ग्रंथरचनेवरून ग्रंथकाराच्या अंतरंगाचा अभ्यास करणें हें जसें पुष्कळदा मनोरंजक, तसेंच, बोधप्रदहि होऊं शकतें. अशाच थोर लेखक कवींच्या पंक्तींत कवि विरागींचें स्थान आहे. 'युगवाणी'त 'गुप्त सरस्वती' या समर्पक शीर्षकाखाली प्रा. हुपरीकरांचा कांहीं विद्वानांशी साहित्य-विषयक झालेला पत्रव्यवहार प्रसिद्ध केला गेला आहेच व प्रसिद्ध होण्यायोग्य असा बराच पत्रव्यवहार त्यांच्या संग्रहीं त्यांनी जपून ठेवलेला आहे.

संस्कृत वाङ्मय व 'महारसू मोदक' असें ज्यांस श्री ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे तो 'वेदान्त' यांविषयीं थोर अभिरुचि ही गणपतराव यांस त्यांच्या वडिलांकडून लाभलेली मोठी देणगी होय. त्यांचे वडील कै. गुरुवर्य बाळशास्त्री हुपरीकर हे येथील राजाराम हायस्कूल व कॉलेज यांमध्ये संस्कृत वाङ्मय मोठ्या रसिकतेने शिकवीत असत. ते 'कादंबरी' शिकवूं लागले, म्हणजे मूळ संस्कृतला संस्कृतांतच मधुर सोपे प्रतिशब्द योजीत योजीत गंभीर आमंद्र आवाजांत अस्खलित गंगाप्रवाहाप्रमाणे चाललेल्या त्यांच्या व्याख्यानसरस्वतीचा ओघ ऐकण्याचा लाभ प्रस्तुत लेखकानेहि घेतलेला आहे. अशा विद्वान्, रसिक, श्रद्धावान पंडिताकडून वेदान्त व साहित्य यांवरील ग्रंथांचें अध्ययन गणपतराव यांस पूर्ववयांतच घरच्याघरीं घडलें, हें विशेष होय. शास्त्रीबोवांची सदभिरुचि व संतवाङ्मयाची आवड असामान्य होती रंगनाथस्वामी, केशवस्वामी इ. च्या सुंदर पदांची गोडी, तीं स्वतः गातां गातां तन्मयतेने अनुभवीत शास्त्रीबोवा अक्षरशः प्रेमार्द्रतेने द्रवत असत ! गणपतरावांतहि हीच सहृदयता ओतप्रोत उतरलेली आहे. पंचदशी, उपनिषदें, ब्रह्मसूत्रभाष्य, अमृतानुभव, काव्यप्रकाश इ. ग्रंथांचा अभ्यास कै. बाळशास्त्र्यांनीं गणपतरावांकडून करवून घेतला. त्याचप्रमाणे, इतर कित्येक जिज्ञासू हुषार प्रौढ विद्यार्थ्यांस बाळशास्त्री जे पाठ देत तेहि ऐकण्याचा लाभ गणपतराव यांस वारंवार घडत असे. म्हणूनच अध्यात्माकडे असलेल्या त्यांच्या स्वाभाविक प्रवृत्तीस उत्कृष्ट गाढ अभ्यासाची अनुरूप जोड आरंभापासूनच लाभली आहे. या शास्त्रांतले गहन विषयांवरील ग्रंथ नवीन नवीन शिकण्याचा व्यासंग त्यांचा अजूनहि चालू आहे. येथील विद्वान् श्रीशंकराचार्य (श्री. मारूलकर) या ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध पंडितवर्यांकडे अजूनहि नवीन नवीन, प्राचीन, न्याय व मीमांसा शास्त्रांचे ग्रंथ वाचून ज्ञानसंपादन एखाद्या तरुण विद्यार्थ्याप्रमाणें गणपतरावांनी चालू ठेवलेलें आहे, तें पाहिलें, म्हणजे या खऱ्या ज्ञानपिपासू प्राध्यापकांबद्दल आदर व कौतुक का बरें वाटणार नाही ! वेदान्ताच्या 'घटपटादि खटपटीं'त तर्ककर्कशतेने अभ्यासाची आवड धरणारी त्यांची बुद्धी वाल्मीकि—व्यास यांच्या प्रचंड वाङ्मयोदधींत कालिदास-भवभूति-बाण प्रभृतींनी निर्मिलेल्या विशाळ साहित्यसरोवरांत व ज्ञानेश्वर-नामदेव-तुकाराम-वामन-मोरोपंत, तसेंच आधुनिक 'बी' तांबे प्रभृति कवींच्या हृदयंगम विपुल काव्यरसतरंगिणींतहि तितक्याच औत्सुक्याने विहार करतांना आढळून येते. सत्यं-शिवं-सुन्दरम् व परतत्त्वस्पर्श ज्या ज्या कृतींत त्याना आढळतो, त्यांचा त्यांचा आस्वाद ते हार्दिकतेने घेत असतात. याशिवाय त्यांचा व्यासंग आङ्गल वाङ्मयांतील थोर कृतींशीं तन्मयतेने जितका झाला आहे, तितकाच बंगाली भाषेचाहि अभ्यास करून त्यांनी रवींद्रनाथांसारख्या श्रेष्ठ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

साहित्यिकांच्या कृतींचा आनंद मुळांतूनच अनुभविला आहे. त्यांच्या अभ्यासांत उथळपणाला थारा नाही. ' Drink deep ' म्हणतात, त्याप्रमाणें, त्यांच्या कुशाग्र-मतीने त्या त्या ग्रंथांचा खोल व मार्मिक अभ्यास केलेला आहे.

१९२४ मध्ये वडिलांचें प्रेमळ कृपाछत्र कालाने हिरावून नेल्याने दुपरीकरांना कांही काल बराच कष्टाचा गेला. पण त्यावेळीं जळगांवचे कै. नारायण नरसिंह फडणीस, ' काव्य रत्नावली ' कर्ते, यांच्या गणपतरावांवरील अकृतिम लोभाने नानांनी त्यांना जळगांवास मुद्दाम बोलावून घेतलें व तेथे कांही काल त्यांना शिक्षकाचें कार्य मिळवून देऊन काठिण समयीं मदत करतां आली. या जळगावच्या रहिवासांत गणपतरावांचा ज्या चांगल्या साहित्यिकांशी परिचय व संबंध आला, त्यांत कै. कवि तिवारी, कवि ' माधव ज्यूलियन् ', कवि बळवंतराव पळशीकर, कवि के. जी. नारखेडे यांचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे. कै. नानासाहेब फडणीस व त्यांचे सुपुत्र वासुदेवराव, पळशीकर व वा. रं. अत्रे इ. इ. व्यक्तींच्या हार्दिक प्रेमाबद्दल दुपरकिरांना अतिशय कृतज्ञता वाटत असते. विशेषत: कै. नानांच्या बद्दल त्यांना पितृतुल्य नितान्त आदर वाटतो. त्यांच्या स्नेह्यांत काविभूषण प्रो. खापर्डे, कै. कविवर्य सुमंत, कवि नागेश, कवि कात्रे शास्त्री यांचा अंतर्भाव केला पाहिजे. जळगावच्या नोकरींतून सुटल्यानंतर हे १९२६ मध्ये कोल्हापुरास परत आले व येथेच त्यांना राजाराम हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून सरकारी नोकरी मिळाली. याच नोकरींत पुढे त्यांनी संस्कृत व मराठी हे विषय घेऊन एम्. ए. ची पदवी संपादन केली व नंतर बी. टी. होतांच त्यांस येथील श्री ताराबाई ट्रेनिंग कॉलेजमध्यें बी.टी. विद्यार्थ्यांसाठीं संस्कृतचे प्राध्यापक म्हणून नियुक्त करण्यांत आले. संस्कृतशिक्षणपद्धतीवरील बहुमोल ग्रंथ लिहिण्याचा त्यांचा संकल्प होऊन तदनुसार व्यासंग, वाचन व अभ्यास अत्यंत परिश्रमपूर्वक त्यांनी याच कालापासून आता-पर्यंत [१९३८-४८] केला. पांच वर्षांपूर्वी बी. टी. कॉलेजांतून राजाराम कॉलेज-मध्ये संस्कृत शिकविण्यासाठी त्यांना घेण्यांत आलें आहे. सुदैवाने आता त्यांस अनुकूल परिस्थिति प्राप्त झाल्याने जें स्वास्थ्य लाभलें आहे, त्याचा विशेष आनंद होतो. आपलें काम बरें व आपला व्यासंग बरा, अशा वृत्तीचे गणपतराव आहेत.

प्रा. गणपतरावांची वृत्ति तत्त्वशोधक गंभीरतेची असली, तरी विनोदाचें त्यांस बिलकूल वावडे आहे, अशांतला मुळींच भाग नाही. गप्पा मारतांना व इतर साहित्यविषयक संभाषणांचा प्रसंग असतांना कित्येक वेळां कोटिक्रम व विनोद यांचा आस्वाद ते रसिकतेने व मार्मिकतेने घेतात व मन:पूर्वक मोकळेपणाने हसतात. दुसऱ्याचें मन कधीहि न दुखाविण्याची यांची वृत्ति आहे. पण उगीच तोंडपुजे-पणाहि त्यांनी कधी आचरलेला दिसत नाही.

त्यांचे जे मित्र आहेत, त्यांत ' वेदान्त ' मित्र ' साहित्य ' मित्र विद्यार्थिमित्र व इतर मित्र असे विभाग पाडतां येतील. पैकी साहित्यमित्रांविषयी येथे दोन शब्द मला माझ्या तदन्तर्भूततेमुळे लिहिणें औचित्यपूर्ण वाटतें. येथेहि पुष्कळ नामवंत साहित्यिक आहेत. पण ते आपपाल्या विशिष्ट कक्षेंत लंबवर्तुळांत फिरणाऱ्या ग्रहांप्रमाणे आहेत ! त्यांच्या परस्परांशी गाठीभेटी होण्याच्या पर्वणी क्वचितच येतात ! ' समान-शीले व्यसनेषु सख्यं ' असतें, हें खरें, पण तें ' समानशील व्यसने सुसख्यम् ' असें व्हायला पाहिजे. येथे अशा प्रकारचें एक ' साहित्यस्नेह मंडळ ' १९२९ मध्ये कवि

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विरागी, कवि नागेश, कवि सुमंत, कवि माधव ज्यूलियन् व प्रो. द. सी. पंगु यांनी सहकार्याने स्थापिलें होतें व या विद्वान् कविसाहित्यिक पंडितांच्या बैठकी केव्हा केव्हा होत असत. कवि विरागींचें 'मधुसंभार' हें पुस्तक याच साहित्यस्नेह मंडाळाचें प्रथम प्रकाशन म्हणून प्रसिद्ध झालें आहे. पुढे लवकरच या मंडळांतून, का कळत नाहीं, पण प्रा. पंगूंनी उदासीनता धारण केली असावीसें दिसतें. पुढे (१९३१) विरागींनी व सुमन्तांनी साहित्यस्नेहमंडळांत मला अन्तर्भूत करून घेतलें. ३-४ वर्षेपर्यंत सुमंत, नागेश, विरागी, माधव ज्यूलियन् व प्रस्तुत लेखक यांच्या साप्ताहिक बैठकी बहुधा रविवारी ३ ते ५, सुमंत खेरीज आम्हां सर्वांच्या घरीं, आळीपाळीने भरत असत. त्यामुळे परस्परांचे विचारविनिमय, चर्चा इ. होण्यास आम्हांस पुष्कळच संधि मिळाली. 'सुमंतां'चा 'भवानिनाद' हा स्फुट भावगीतांचा संग्रह 'काव्यरत्नावली' कर्त्यांच्या कृपेने विरागींच्या सहाय्याने १९३२ मध्ये 'साहित्यस्नेहमंडळा'चें दुसरें प्रकाशन म्हणून प्रसिद्ध झाला. 'भावनिनादा'स विरागींनी ६५ पृ. चीं विस्तृत भूमिका लिहिली असून मराठींतील अध्यात्मवादी (Mystic) कवितेसंबंधीं त्यांत चांगलें विवेचन केलेलें आहे. कविमनाचा अभ्यास कसा व्हायला पाहिजे, या दृष्टीने सुमंतांच्या कवितेसंबंधी त्यांनी केलेलें अभ्यासपूर्ण समालोचन वाचनीय व साहित्यिकास उद्बोधक वाटण्यासारखेंच उतरलेलें आहे. परंतु पक्षपाती पंडित चर्चिकांनी सोईस्करपणें त्याचेकडे कानाडोळा केलेला दिसतो. तथापि त्यामुळे विरागींच्या विचारांस कमीपणा येतो असें मुळींच नाही. साहित्यप्रांतांत लाभणारे 'कसोटीचे दगड' खऱ्या कसोटीचे अनेकदा ठरत नाहीत, उलट पक्षपाती व विपरीत रीति दाखवितात, हा अनुभव वारंवार अलीकडे येऊं लागलेला आहे. परंतु यामुळे लेखांची कसोटी तितकीशी न लागली, तरी 'दगडां'चीच कसोटी लागते, हें सत्य मर्मज्ञ जाणतातच! 'साहित्यस्नेहमंडळा'चें तिसरें व शेवटचें प्रकाशन म्हणजे 'माझें सुश्लोकगोविंद' हें पुस्तक होय (१९३४). या पुस्तकाच्या प्रसिद्धीच्या कार्यांत, त्याचप्रमाणे, रसिकतेने त्यांतील अलंकारसूची तयार करण्यांत गणपतराव व त्यांचे धाकटे बंधु रा. राजाभाऊ, बी. ए., बी. टी. यांनी अत्यंत आपुलकीने साहाय्य केलें आहे. एकंदरींत, रा. गणपतराव व त्यांचे बंधु यांची साहित्यप्रांतांतली मर्मज्ञता उच्च दर्जाची आहे, हें स्वानुभवावरून मला निःसंशय म्हणतां येईल. दुर्दैवयोगाने १९३९ मध्ये प्रथम कवि सुमंत यांच्या व नंतर माधव ज्यूलियन यांच्या अकालीं निधनाने या साहित्यप्रेमी मंडळांतील थोर व आस्थेवाईक घटकांस निर्घृण कालाने हिरावून नेलें, ही फारच मोठी हानि झाली. नंतर कवि नागेश हेहि कोल्हापुर सोडून कोकणांत स्वग्रामीं गेले व 'साहित्यस्नेह-मंडळ स्मृतिशेष झालें, असेंच जवळ जवळ मान्य करायला हरकत नाही!

काव्य या दृष्टीने विरागी यांच्या 'मधुसंभारां'त नांवाप्रमाणें खरोखरच गोडवा, रसमयता, सफाईदार शुद्ध रचनापद्धति व परतत्त्वास स्पर्श करूं पाहणारी उच्च दर्जाची प्रतिभा हे सद्गुण प्रामुख्याने आढळून येऊन सहृदयास अत्यानंद वाटतो. प्रा. श्रीनिवास नारायण बनहट्टी यांच्यासारख्या मर्मज्ञांनी 'मधुसंभारा'चें फारच योग्य समालोचन केलें असून त्यांनी विरागींच्या काव्याचा व उच्च मनोवृत्तीचा उत्कृष्ट परामर्श घेतलेला आहे (लोकशिक्षण १९२९). मधुसंभारांतील एक नमुना म्हणून 'ज्योत्स्नासागर' ही सुंदर कविता विरागींची उत्तुंग कल्पना व प्रतिभा यांचें दर्शन घडविण्यास बस्स आहे! विरागींच्या काव्यांत केवळ गूढ गूंजनच आहे, असा

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गैरसमज कांही व्यक्तींनी कविता न वाचतांच करून घेतला आहे, तो अस्थानीं होय. सहृदय जाणते लोक असें कधी करीत नाहीत.

विरागींनी अक्षरगणात्मक वृत्तें व मात्रात्मक जाति या दोन्ही प्रकारांत सुंदर काव्यरचना केली आहे. विरागींचें आणखी एक वैशिष्ट्य हें आहे की, त्यांना रागतालात्मक संगीताचीहि अभिनंदनीय रसिकता आहे. तशीच रसिक मंडळी भेटली, तर ते आपली एकाद दुसरी कविता सुंदर चालींत छानदार म्हणून दाखवूं शकतात. मात्र त्यांनी—

"काढोनि दौरे करितात गानें,
अन् वृत्तपत्रीं भरती रकाने !"—

असा प्रकार कधीच केलेला नाही ! सुमंत व विरागी यांच्या बैठकींत त्यांच्या पुष्कळ कविता तन्मयतेने ऐकण्याचा लाभ मला केव्हा केव्हा त्यांच्या सान्निध्यांत लाभलेला आहे. त्यांची शालीन, भावमधुर, रसमन्थर कविता ऐकण्यास श्रोतेहि एका विशिष्ट पातळीवरचेच हवेत. आणि, असे श्रोते बहुसंख्य असणें कसें शक्य आहे ? उथळ व थिल्लर कवितांना बहुसंख्य तशाच वृत्तीचे लोक भुलणार; हें काय सांगायला पाहिजे !

प्रा. हुपरीकर यांच्या गद्य टीकात्मक लेखांचा उल्लेख येथे करायचा म्हटलें, तर आणखी बरेंच लिहिण्यासारखें आहे. 'कवीचा अंत:साक्षात्कार' ही त्यांची लेखमाला 'विविधज्ञानविस्तारां'त क्रमश: १९२९ त प्रसिद्ध झाली. तींतील विवेचनावरून वाचकांस सहजच कळून येईल की, हुपरीकरांचा व्यासंग व विचारांचा पल्ला केवढा व्यापक आहे ! ते ज्या पातळीवरून वाङ्मयाची कसोटी लावूं पहातात व काव्यनिर्मितीच्या गुणावगुणांची चिकित्सा करून उत्कृष्टता ठरवितात, ती पातळी आपल्या आर्यपरंपरेच्या औपनिषदिक उद्गात्यांपासून ते आधुनिक रवीन्द्रनाथांसारख्या, किंवा तांबे–'बी' सारख्या, तत्त्वज्ञ कविश्रेष्ठांपर्यंत सर्वांच्या कृतींच्या पार्श्वभूमीस कारण असलेल्या प्रतिभेची प्रक्रिया समजावयाला जिज्ञासूस साहाय्यक झाल्यावाचून रहाणार नाही.

त्याचप्रमाणे प्रा. हुपरीकरांचा 'तत्त्वज्ञ कवि ज्ञानेश्वर' हा 'ज्ञानेश्वर दर्शनां'-तील प्रथम विभागांतला सुमारें १०० पृष्ठांचा विस्तृतलेख अतिशय अभ्यसनीय आहे. कवि, काव्य यांच्या विविध प्रकारांचें त्यांत विवेचन असून श्री ज्ञानेश्वरांचे मौलिक तत्त्वज्ञ व कविश्रेष्ठ या दृष्टींनी ज्ञानेश्वरीवरून त्यांनीं काढलेले निष्कर्ष, हुपरीकरांचा सखोल अभ्यास, त्यांची सहृदय मार्मिक चिकित्सापद्धति व तत्त्वज्ञानाची त्यांच्या हृदयांत मुरलेली आत्यंतिक आवड यांची साक्ष देण्यास अगदी पुरेसे आहेत. मनो–विश्लेषणाच्या दृष्टीनेहि गणपतरावांनी या लेखांत पौरस्त्य व पाश्चात्य पद्धतींनी तत्त्वज्ञ कवींच्या शक्तींचें अवगाहन करून विवेचन केलेलें आहे. वाचकांनी मुळांतूनच या विचारपूर्ण व्यापक निबन्धाचा अभ्यास करावयास हवा.

याशिवाय विरागींचे इतरहि विवेचक, साहित्यसमीक्षणात्मक व वेदान्तविषयक लहानथोर बरेच निबंध अनेक नियतकालिकांतून आतापर्यंत आलेले आहेत. उदाहरणार्थ—

१. काव्यांतील सामान्यकथन ('नवजीवन', १९३५ वर्षारंभ)
२. काव्याच्या शाळा असाव्या काय ? ('नवजीवन', १९३४ डिसेंबर)
३. 'मुरलीकगोविंद' काव्यपरीक्षण ('विहंगम', १९३४ सप्टेंबर)

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

४. विचार–स्वातंत्र्य ('नवजीवन', १९३७ नोव्हेंबर)
५. कै. आगरकरांचें वैशिष्ट्य ('पूर्णेंदु')
६. सच्चिदानंद ('तत्त्वज्ञानमंदिर')
७. तांब्यांचें व्यक्तिमत्त्व ('राजारामियन्', स्वातंत्र्यसंवत्सरांक)
८. Sublimation of Instincts S. M. T. Training College Magazine)
९. निरीक्षण ('विविध ज्ञान विस्तार', फेब्रुवारी १९३३)
१०. सत्य आणि सौंदर्य ('राजारामियन')
११. 'आदिकाव्याचा जन्म' ('हिंद' मासिक १९४८)

त्याचप्रमाणे, संस्कृत भाषेंतहि त्यांचें बरेंच लिखाण प्रसिद्ध झालेलें आहे. अलिकडेच करवीर पीठाचे विद्वान् श्रीशंकराचार्य (पं. मारूलकर) यांच्या 'धार्मिक विमर्शसमुच्चय:' द्वितीयोविभाग: या संस्कृतनिबंधावलीस प्रा. हुपरीकर यांनी गीर्वाणभाषेंत सविस्तर सुंदर उपोद्घात लिहिलेला आहे. त्यांचें संस्कृत प्रभुत्व या भाषेंत कमनीय वक्तृत्व करण्याइतकें उत्तम आहे.

थोडक्यांत एवढें खास म्हणतां येईल कीं गणपतरावांत विद्वत्व, सहृदयत्व, कवित्व उत्कटत्वाने वसत असून पाश्चिमात्य व पौरस्त्य ग्रंथांच्या त्यांच्या गाढ परिशीलनानें त्यांच्यांत व्यापक दृष्टिकोण आलेला आहे. जुन्या नव्यांतील अत्युत्कृष्ट विचारांचा समन्वय साधण्याची त्यांची उदार व विशाल विचारशीलता त्यांच्या आर्याभिमानास साजेशीच आहे. केवळ पाश्चिमात्य शास्त्रांच्या एकांगी वाचनाने आपल्याकडील उपनिषदें, भाष्यें, साहित्यशास्त्र, तत्त्वज्ञान इत्यादिकांतील मूलगामी विचारांकडे आमचे कांहीं विद्वान् जी विमुखता प्रकट करतात, ती किती दिशाभूल करणारी आहे, याची कल्पना प्रा. हुपरीकरांच्या लेखांतून व त्यांच्या नव्या " The Problem of Sanskrit Teaching & Hindu Methodology of Education Vc. " या सर्वांगपरिपूर्ण ग्रंथांतील विवेचनाने वाचकांस येईल. या ग्रंथांत त्यांच्या अनेक वर्षांच्या अनेक ग्रंथांच्या परिशीलनाने व चिंतनानें बनलेले त्यांच्या विचारांचे परिपाक त्यांनीं सुंदरतेने मांडलेले आहेत. हुपरीकरांच्या बुद्धीस चालना देणारी जी ऋषिप्रणीत, आचार्य–ज्ञानेशादि प्रणीत, व विद्वान् पितृदेव प्रणीत प्रेरणा लाभली, तीच किती योग्य ठिकाणीं लाभली, हें गणपतरावजींच्या थोर कार्यावरून दिसून येते. 'क्रियाहि वस्तूपहिता प्रसीदति' या कालिदासोक्तीचें हें प्रत्यंतर होय.

गणपतराव यांचा जन्म २८-७-१८९९ चा आहे, म्हणजे नुकतेंच त्यांनीं ५० व्या वर्षांत पदार्पण केलेलें आहे. त्यांना चार मुलगे आहेत. थोरला चि. बाळ पुण्यास आर्योग्ल वैद्यकाच्या कोर्समध्ये शिकत आहे. गणपतरावांचे बंधु रा. राजाभाऊ हे येथील शिक्षणखात्यांत इन्स्पेक्टर आहेत. राजाभाऊ व गणपतराव यांचें सौभ्रात्र आदर्श वाटण्याजोगें आहे. राजाभाऊंची आपल्या बंधुवर्यांविषयीं – आण्णांविषयीं – निःसीम प्रेमादरभक्ति आहे. राजाभाऊंच्या संसारदक्ष कार्यसाचिव्यामुळे गणपतराव यांना घरचें इकडचें तिकडें कांहीं करावें न लागतां त्यांना आपल्या व्यासंगास भरपूर स्वास्थ्याचा लाभ होतो. ऋजुता, गार्हस्थ्य धर्मशीलता, व सौजन्य हीं हुपरीकरांचीं वैशिष्ट्यें उत्कृष्टतेने वाखाणण्यासारखीं आहेत.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

काव्याचें जीवनांतील स्थान

प्रा. पुरुषोत्तम शिवराम रेगे, बी. एस्सी.

● मुंबईचे सुप्रसिद्ध कवि प्रा. रेगे यांचीं काव्यासंबंधींचीं विशिष्ट मतें आहेत. ‘युगवाणी’त यापूर्वी त्यांचे ‘आधुनिक कवितेच्या निमित्ताने’ या मथळ्याखालीं दोन लेख प्रसिद्ध झाले होते, त्यामुळे बरीच खळबळ उडाली होती! त्यांचा प्रस्तुत लेख त्याच प्रकारचा आहे!

‘कवीची जुळवणूक–adjustment—म्हणजे काव्य’ असा सिद्धांत सांगून “लौकिक व्यवहारांत काव्याला राबवूं नका”—असा इशारा प्रा. रेगे यांनी दिला आहे.

★

काव्याला आज आमच्या जीवनांत स्थान आहे काय, हा खरोखरच एक महत्त्वाचा प्रश्न आहे. चालू यांत्रिक युगांत आमचें सर्व जीवनच यंत्रबद्ध झालें आहे. करमणुकीच्या क्षेत्रांत सुद्धा व्यक्तीच्या आत्माविष्काराला फारसा अवसर नाही. लोकगीतें व नृत्यें, ललितें व तमाशे यांत जो व्यक्तीच्या विकासाला वाव असे, तो आमच्या सिनेमा–नाटकांत आज राहिलेला नाही. सिनेमाची तर अशी कांही एक तंत्रबद्ध पोलादी चौकट झाली आहे की, त्यामुळे प्रेक्षक, नट आणि सूत्रधार यांतील अंतर अगदीच दुरावलें आहे. प्रेक्षकाचें काम फक्त निमुटपणें पहायचें व ऐकायचें. सिनेमाचा प्रेक्षक हा या दृष्टीने आधुनिक युगाचा प्रतिनिधिच म्हटला पाहिजे. ज्यांत आत्माविष्काराला भरपूर वाव आहे, अशा करमणुकीच्या प्रकारांत नटाचें व प्रेक्षकाचें जें उदात्तीकरण व वृद्धीकरण होतें, त्यांना या युगांत जवळ जवळ स्थानच नाही, हें सिनेमानें सिद्ध केलें आहे. याचें प्रत्यंतर आपणांला सहज पहायला सापडतें. सिनेमाचा खेळ संपल्यानंतर बाहेर पडणाऱ्या प्रेक्षकांच्या चेहऱ्याकडे जरा बारकाईने पहा. कोणीतरी मुस्कटांत मारल्याप्रमाणे, किंवा कसला तरी भयंकर धक्का बसल्या-प्रमाणे हे सुन्न झालेले प्रेक्षक मुग्धांसारखे खेळघरांतून बाहेर पडतात. आजच प्रेक्षक पूर्णपणें आत्माविष्काराला पारखा झाल्यामुळें स्वतःची कोंडी फोडून तो क्वचितच बाहेर येऊं शकतो. तो लोकांत एक जड घटक म्हणून वावरतो; पण लोक-जीवनांत त्याला निश्चित व अनन्य साधारण स्थान नसतें. त्याच्या आंतरिक जीवनाची कुचंबणा झालेली असते. जीवनांत यंत्रबद्धता जितकी अधिक, तितकी ही कुचंबणाहि अधिक. अशा परिस्थितींत व्यक्तीला दोनच मार्ग मोकळे असतात: ‘समाजाच्या जड जीवनाशीं मिळतें घेऊन आपलें जीवन कंठणें’ किंवा बंडखोरी करून आपला ‘सवता सुभा’ स्थापन करणें. परंतु सामाजिक बंडखोरीला लागणारी मनाची तयारी किंवा साधनांची सुलभता फारच थोड्यांच्या वाट्याला आलेली असते. बहुतेक लोक

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वारा येईल तशीच पाठ फिरवितात. व्यक्तीच्या निराळेपणामुळें किंवा दुर्बलतेमुळें म्हणा—समरप्रसंग टाळून मिळतें घेण्याची तिची प्रवृत्ति नसेल, तर सध्याच्या काळांत तिला स्थान नाहीं. अशी व्यक्ति अर्ववटांच्या सदरांत मोडते; व तिचा जीवनवृत्तांत तपासण्यासाठीं कॉरोनरचीं कोर्टें, वेड्यांचीं इस्पितळें आणि प्रत्येक घरांतील न बोलल्या जाणाऱ्या गोष्टी तपासाव्या लागतात !

काव्य हें आत्माविष्काराचें एक माध्यम असें जर तात्पुरतें मान्य केलें, तर चालू युगांत त्याला स्वतःचें व निश्चित असें स्थान जवळ जवळ नाहीच, असें कबूल करावें लागेल. यांत्रिक युगाने व्यक्तीच्या जीवनाचा प्रत्येक कोनाकोपरा व्यापून टाकला आहे. स्वतःच्या भावनांची आपणांस लाज वाटते. आपणांला निराळेपणा नको असतो. आचार-विचारांत, पोशाखांत, जीवनाच्या सर्व अंगांत, इतरेजनां-सारखें असण्यांत आपण भूषण मानतों व त्याप्रमाणे रहाण्याचे प्रयत्न करतों. सामा-जिक जडजीवनाचा परिणाम आपणांवर इतका झालेला असतो की, त्यांतून आपलें व्यक्तित्व क्वचितच प्रभावीपणाने बाहेर उमटून दिसतें. अर्थात् पूर्वीच्या काळींसुद्धा समाजाचें दडपण व्यक्तीवर असे. परंतु समाजाच्या प्राथमिक अवस्थांत व्यक्तिजीवनाचे फारसे प्रश्नच उपस्थित होत नाहीत. समाजाचीं बंधनें व्यक्ति सहज पाळीत असे. व्यक्तीच्या आपलेपणा (Personality)चा विकास मर्यादित असल्यामुळे समाजाचे दडपण जाणवत नसे आणि त्यामुळे तें तितकें जाचकहि होत नसे. आज अगदीं वेगळी परिस्थिति आहे. व्यक्तीच्या आपलेपणाचा विकास झाला आहे, तो तसा टिकविण्यासाठीं आणि अधिक प्रभावी करण्यासाठी आवश्यक साधनें उपलब्ध आहेत; परंतु त्याचबरोबर लोकजीवनाच्या मर्यादा इतक्या संकुचित आणि ठराविक साचाच्या झाल्या आहेत की, त्यामुळे व्यक्तिजीवन रोगट आणि खुरटें झालें आहे. काव्याचें किंवा कोणत्याहि कलेचें आजचें स्थान ठरवितांना हा फरक नेहमी लक्ष्यांत घेतला पाहिजे.

काव्याचें स्वरूप

काव्याचें मूळ स्वरूप काय, याचा जर आधी थोडा विचार केला, तर त्याचें आज कोणतें स्थान आहे व पुढे कोणतें राहील, या दोन प्रश्नांचा विचार करणें सोपें होणार आहे. काव्य ही एक समस्या आहे, एक नवसृष्टि आहे. प्राण, शरीर व आत्मा हीं जशीं सृष्ट पदार्थांचीं अंगें, तशींच काव्याचींहि ठरवितां येतील. भावना हा काव्याचा प्राण, यथातथ्यता (Proportion) हें शरीर आणि गूढ-दर्शन हा आत्मा समजला पाहिजे. काव्य या तिन्ही कसोटीला उतरलें पाहिजे. या तिहींचा योग्य समन्वय झाला पाहिजे. आणि म्हणूनच जें पूर्ण नाहीं, तें काव्य नाहीं. खरें काव्य कधींच खटकणार नाहीं. भावना वेगळ्या असतील, अभिव्यक्ति अपरिचित असेल, जीवनदर्शन ‘ भयंकर ’ असेल—पण हें सर्व इतकें सहज झालेलें असेल की, त्यावर वेगळें भाष्य करण्याची आवश्यकता उरणार नाहीं. काव्य किंवा कोणतीहि इतर सृष्ट वस्तु प्रथम शरीररूपाने आपणांसमोर येत असल्यामुळे त्याच्या व्यापारांत यथातथ्यतेला विशेष महत्त्व आहे. यथातथ्यतेचा अर्थ मी Realistic असाच केवळ करीत नाहीं. यथातथ्यता म्हणजे पूर्णता—सर्व दृष्टींनी पूर्णता. काव्य वाचतांना किंवा वाचल्यानंतर आपल्या आंतरिक जीवनाचा एक कोपरा—मग तो

 किती लहान का असेना—तुडुंब भरला गेला पाहिजे. त्यांत कांहीं अधिकउणें असावें,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असें वाटतां कामा नये. उत्तम काव्य यथातथ्यतेच्या पुढें जातें. पूर्णतेच्या पुढे सुद्धा पूर्णतेच्या कांही पायऱ्या आहेत, असें मानलें, तर अशा प्रकारच्या काव्यांतून कांही विशिष्ट जीवनदर्शन सतत आणि प्रगतपणें होत असतें. तें कसें आणि कोणत्या प्रमाणांत होईल, हें अर्थात् त्या काव्याच्या सामर्थ्यावर आणि रसिकाच्या तयारीवर अवलंबून राहील. अशा काव्याला काळाचीं दंशनें चिकटत नाहीत. नेहमीच तें ताजें असतें. आणि, यामुळेच काव्याला इतिहास नसतो. कोणतें काव्य केव्हा लिहिलें गेलें, याची लौकिक चर्चा जरी कांही वेळ अवश्य असली, तरी काव्याच्या रसग्रहणाच्या दृष्टीने तिला बिलकुल महत्त्व नाही. जे आज, उद्या, केव्हाहि तुमच्या मनाची पकड घेईल, तें काव्य.

शुद्ध काव्य

काव्याचें हें स्वरूप समजून त्याच्या अगदी मुळाचा ठाव घेणें शक्य आहे काय ? शुद्ध काव्य (Pure or Sheer Poetry) अशी एकादी चीज आहे काय ! लोकगीतांत किंवा अर्थनिरपेक्ष बालगीतांत शुद्ध काव्याची थोडी चुणूक दिसते. काय सांगितलें आहे, यापेक्षा तें कसें सांगितलें आहे, हें काव्यांत अधिक महत्त्वाचें असतें. (या विधानाचा विपर्यास करणें शक्य आहे, हें समजूनहि मी हें मुद्दाम करीत आहे. का, तें पुढे ओघाने येईलच.) काव्यांतून वरवर जाणवणाऱ्या अर्थापेक्षा त्यांतून जें एक विशिष्ट आणि निराळेंच वातावरण कवि निर्माण करतो, त्यांतच काव्याची खरी बैठक असते. काव्य म्हणजे निबंध नव्हे. काव्य म्हणजे जाणूनबुजून जीवनदर्शनासाठी केलेला प्रयत्न नव्हे. काव्य म्हणजे केवळ आत्माविष्कारहि नव्हे. यथातथ्यता हें जर काव्याचें दृश्य रूप मानलें, तर काव्य म्हणजे कवीची एक ‘ जुळवणूक ’ (Adjustment) ठरतें. कवीचें मन आणि काव्यवस्तु यांच्या संघर्षांतून जी जुळवणूक उत्पन्न होते, तेंच काव्य. या जुळवणुकींत जितकी यथातथ्यता असेल, तितक्या प्रमाणांत त्यांत काव्य अधिक. ही यथातथ्यता आली, असें खुद्द कवीलाच जेव्हा वाटेल, तेव्हा काव्य पूर्ण झालें, असें समजावें. म्हणूनच काव्य किंवा कोणतीहि कलाकृति पूर्ण झाल्यानंतर निर्मात्याला जो शीण येतो, त्यांत दोन अंगें असतात—त्यांत परावृत्तिहि असते आणि समाधानहि असते. काव्याच्या शरीराचा अधिक विचार केला की, असें आढळून येते की, त्यांतील शब्दांच्या मांडणींतच एक प्रकारचें कल्पनाधिष्ठित सामर्थ्य असतें. उत्तम काव्य त्याच भाषेंत जर निराळ्या शब्दांत लिहिलें, तर त्याचें रूप एकदम बदलतें. दुसऱ्या भाषेंत त्याचें रूपांतर होऊं शकेल—पण तेंहि तितकीच तयारी आणि सहृदयता असलेल्या रसिक लेखकाकडून. काव्याच्या शरीराची ही योग्य दखल न घेतल्यामुळे काव्याच्या स्वरूपासंबंधीं अपसमज रूढ झालेले दिसून येतात. काव्यांतून व्यक्त होणारे विचार, किंवा जीवनदर्शन, यांना अवश्य महत्त्व आहे; पण काव्यांत त्यांना आपलें असें स्वयंभू स्थान नाही. त्यांचें स्थान, त्यांच्या मर्यादा, त्यांचा आविष्कार, किंबहुना त्यांचें अस्तित्व, काव्याच्या शरीरावर अवलंबून असतें. “ कौशल्य मोठें रचनेंत आहे—” हेंच शेवटीं खरें ठरतें. कवीच्या जुळवणुकीमुळेच काव्यविषयाला वेगळें असें एक काव्यात्म रूप प्राप्त होतें. कालिदासाने “ श्लोकत्वमापद्यत यस्य शोकः ” असें जें वाल्मीकि ऋषीविषयीं म्हटलें, तें याच अर्थानें. बऱ्याच टीकाकारांना ही वस्तुस्थिति मान्य करणें कमीपणाचें वाटतें. कारण त्यांत नवीन असें कांही दिसत नाही. शिवाय रचनेपेक्षा विचाराला

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्राधान्य दिल्यामुळें आपण एका कांहीं उच्च भूमिकेवरून काव्याकडे पहातों, असाहि त्यांचा समज असतो. त्यांत कांहीं तरी अधिक शास्त्रीय -Scientific- दृष्टी आहे, असें त्यांना नेहमी वाटत असतें. वास्तविक हें सर्व खोटें आहे. स्त्रीपुरुष- संबंधांवरील शास्त्रीय विवेचनासाठी हॅवलॉक एलिसचे ग्रंथ वाचणें योग्य – नव्हे, अवश्य – ठरेल; पण त्यांत जें सांगितलेलें आहे (किंवा नाही), तें एकाद्या काव्यपंक्तीत सहज मागून टाकलेलें आढळेल. देशभक्तिपर प्रबंध वाचून जी स्फूर्ति मिळणार नाही, ती एकाद्या लहानशा ज्वलंत गीतांत आढळेल. प्रचारकी काव्याची (किंवा इतर कलांची) चाय गत होते, हें ज्याला माहित आहे, तो तरी निदान 'उच्च पातळीच्या' काव्याची तरफदारी करणार नाही. अशी तरफदारी करतो त्याला कवीचे मनोव्यापार आणि काव्याचें मर्म समजलेलें नाहीं, किंवा समजूनहि तो मुद्दाम बुद्धिभेद करूं पहात आहे, असें खुशाल समजावें.

गीत आणि कविता

कवीची adjustment म्हणजे काव्य, असें आपण पाहिलें. आतां, या व्याख्येच्या अनुरोधाने आपल्या पहिल्या प्रश्नाकडे वळूं. यांत्रिक युगांतील बाह्य परिस्थितीच्या दडपणामुळे ही adjustment दिवसेंदिवस विशेष कठीण होत चालली आहे. लोकजीवन आणि व्यक्तीचें आंतरिक जीवन यांत अधिकाधिक तफावत पडत चालली आहे. हीच परिस्थिति जर अशी चालू राहिली, तर काव्याचें आपल्या जीवनांतील स्थान अधिक संकुचित आणि अनियमित होणार आहे. पाश्चिमात्य देशांत हें झालेंच आहे. तेथे गीत आणि कविता असे पद्याचे दोन मुख्य भाग पडले आहेत. जुजबी आणि परिचित भावना ठराविक शब्दांतून आणि ठराविक प्रतिमांच्या साहाय्याने गीतांत मांडल्या जातात. असल्या गीतांचे सहस्रावधि रेकॉर्ड्स् तयार होतात व घरोघर, नाचघरांत आणि संगीतघरांत ते लावले जातात. कविता मात्र अधिक उत्कटतेने आत्मलक्षी (intensely personal) होत चालली आहे. पहिल्या भागाला जर 'लोककाव्य' म्हटलें, तर आयर्विंग बर्लिनसारखे लाखांनी गीतांवर पैसे मिळविणारे या लोककाव्याचे महाकवि म्हणायला हवेत. याच्या उलट, साधारण वाचक कवितेपासून दुरावत चालला आहे. त्याला आजची कविता समजत नाही. त्यांतील प्रतिमा त्याला अनोळखी आणि काव्यहीन वाटतात. त्या समजून घेण्याची त्याला फुरसद नसते आणि इच्छाहि नसते. आपल्याच गटांतील समानशील कवीं-खेरीज इतर किती लोक खरोखरच आपल्या कविता वाचतात, आणि वाचून त्या पचवितात, याची आकडेवारी जर उपलब्ध झाली तर त्यावरून कवितेच्या आजच्या जीवनांतील स्थानाची कांही कल्पना करतां येईल.

तीन कवी

ही रुखरुख बऱ्याच कवींना जाणवते. त्यांपैकी कांही मग कवितेचा नादच सोडून देतात आणि दुसऱ्या वाङ्मयप्रकारांकडे वळतात. कांही लोकांसाठी लोकगीतें लिहून लोकानुरंजनाचे पुरस्कर्ते बनतात. आणि, अगदीच थोडे आपलें स्वत्व टिकवून धरतात. कवितेचा नादच सोडून देणारांचा अर्थात प्रश्नच उरत नाही. तेव्हां दुसऱ्या व तिसऱ्या विभागांतील कवींच्या भूमिकांचा थोडा विचार करणें अवश्य

आहे. कवितेने लोकानुरंजन होणें, कोणत्याहि प्रकारचा यशस्वी प्रचार होणें, सध्याच्या युगांत जवळ जवळ अशक्यच आहे. काव्याचा इतका मन:पूर्वक विचार फारच थोडे जण करतात. व्यक्तीला आपल्या दैनंदिन जीवनांत जी स्फूर्ति आणि साथ हवी असते, तिच्यासाठी ती क्वचितच काव्याकडे वळते. आपलें एक कांहीतरी आंतरिक जीवन आहे आणि तें अधिक सकस व समृद्ध केलें पाहिजे, ही जाणीवच जवळ जवळ बोथट झाली आहे. रोजच्या जीवनांतील प्रत्येक गोष्ट वेळ मारून नेण्यासाठी आणि वेळ घालविण्यासाठी केली जाते. तिच्यामागे अवश्य असणारी तळमळ आणि उत्कटता अशी नसतेच. अशा लोकांना काव्याच्या द्वारें शिकवण देऊं पहाणें म्हणजे व्यर्थ खटाटोप आहे. याचा अर्थ मात्र असा नव्हे की, लोकानुरंजन करूं नये, लोकांना शहाणे करूं नये. हें सर्व अवश्य करावें. पण काव्य हें त्याचें माध्यम नव्हे. मूलभूत संशोधनासाठी प्रयोगशाळा स्थापा, समाजाचे व्यापार समजून घेण्यासाठी संशोधनशाळा काढा, लोकांना साक्षर करा, ज्ञानाच्या मर्यादा वाढवा, लोकांना भरपूर अन्नवस्त्र व जीवनांतील सुखसोयी मिळतील असें करा, ज्ञान कामाला लावा—पण त्यासाठी काव्याला राबवूं नका. काव्याचा पिंडच वेगळा आहे. ज्यांना खरोखरच समाजहिताची तळमळ आहे, त्यांच्यासाठी काव्य किंवा इतर कोणतीहि कला नाही. प्रत्यक्ष कार्य करणेंच त्यांना अधिक शोभून दिसेल. आणि, त्यांच्या भ्रष्ट कलेपेक्षा त्यांच्या अशा कार्यानेच समाज जास्त सुखी होईल, आणि, म्हणूनच महात्माजींसारख्यांची कलेकडे पहाण्याची दृष्टि मी पसंत करतों. तिच्यांत प्रामाणिकपणा आहे —आपल्या व कलेच्या दोन्ही मर्यादा ओळखण्याइतका प्रामाणिकपणा आहे. महात्माजींच्या नांवावर विकले जाणारे जे लोक कला हें प्रचाराचें, लोकशिक्षणाचें साधन आहे, म्हणून आग्रह धरतात, त्यांना महात्माजींची ही विशाल भूमिकाच समजली नाही, असें म्हटलें पाहिजे.

काव्यांतील ‘ खाजगीपणा ’

आपलें स्वत्व टिकवूं पहाणाऱ्या कवींचा जो वर्ग आहे, तोच आमच्या आजच्या जीवनांतील काव्य सांभाळूं शकेल. काव्याचा आंतरिक जीवनाशीं अगदीं निकटचा संबंध असल्यामुळे त्याचें स्वरूप केव्हाहि उत्कटतेने खाजगीच रहाणार. हा खाजगीपणा केवळ कवीच्याच दृष्टीने नव्हे, तर रसिकाच्याहि दृष्टीने. आता, कधी कधी कवीच्या काव्यांतील प्रतिमा इतक्या खाजगी असतील की, त्या इतरांना सहसा आकलन होणार नाहीत. पण हें कांही वेळां अपरिहार्य असतें. बाह्य वस्तूंची कवीच्या मनावर होणारी प्रतिक्रिया, कवीची दृष्टि व प्रतिमांच्या रूपाने त्यांतून उद्भवणारी काव्यसृष्टि नेहमीच पूर्णांशाने समजेल, असें नाही. परंतु उत्तम काव्याच्या बाबतींत आपणांला नेहमी असा अनुभव येतो की, त्या सर्वच काव्याचा मिळून एक ‘ Ethos ’ किंवा ‘ आत्मा ’ असतो व त्याची आपणांला आपल्या अंतर्मनांत पूर्ण ओळख पटते. त्या काव्यांतील कांही भाग, एखादी ओळ, किंवा प्रतिमा पूर्णांशाने समजणार नाही. परंतु हें असें जरी झालें, तरी त्यामुळे आपला काव्यानंद कांही कमी होत नाही. अशा काव्यांत न समजलेला भागहि खटकणार नाही. समग्र काव्यांतील आपल्या स्थानाची कल्पना तो देऊं शकतो. कोलरिजची ‘ कुब्ला खान ’ किंवा ‘ बी ’ कवींची ‘ चांफा ’ या कविता या दृष्टीने विचारांत घेण्यासारख्या आहेत. एवढ्याच साठी काव्याचें रसग्रहण करतांना समग्र रचनेचें अधिक महत्त्व आहे. अभिव्यक्ति या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दृष्टीने एकाद्या काव्यरचनेंत वैगुण्यें नसतील, असें मी म्हणत नाहीं. पण तो गौण भाग समजला पाहिजे. कवीची प्रतिभा जसजशी प्रगत होते, तसतशीं हीं तांत्रिक दोषस्थळें आपोआपच कमी होतात. घोडेस्वार जेव्हा आपल्या मांडीखालील घोड्याला पूर्णपणें विसरून घोडदौडीचे सर्व व्यवहार लीलेने करूं शकतो तेव्हाच आपण त्याला निष्णात म्हणतों. त्याचप्रमाणे, कोणत्याहि कलेचें तंत्र आत्मसात् झालें की, त्याची जाणीवच उरत नाही. खरा कलाकार आपला स्वत:चाच निष्ठुर टीकाकार असतो. कारेल कापेकने सर्व कलाकारांना एक महत्त्वाचा महामंत्र दिला आहे—" छाटा ! " अनवश्यक असें कांहीहि असतां कामा नये ! एकाद्या शब्दाचा मोह, ओळीचा मोह, कसलाच मोह लेखकाने धरतां कामा नये. समग्र रचनेंत एक प्रकारचा कलात्मक एकजिनसीपणा (Organic Unity) पाहिजे. म्हणजेच एकंदर चित्रणांत यथातथ्यता आली पाहिजे. ज्याचें काव्य या कसोटीला उतरतें, त्याचें काव्य खाजगी असूनहि खाजगी उरत नाही. किंबहुना याच खाजगीपणामुळे तें वाचणाराचें मन वेधून घेतें. त्याच्या काव्यांत खाजगीपणा असला, तरी तो स्वत: त्यांत व्यक्तिरूपाने नसतो. उत्तम काव्यांत खुद्द कवीला केव्हाच स्थान नसतें.

आधी जीवन सुधारा

जीवनांतील काव्य जर टिकवायचें असेल, वाढीला लावायचें असेल, तर त्यासाठी लौकिक व्यवहारांत काव्याला राबवून घेणें हा नि:संशय मार्ग नाही. त्यासाठी जीवनच समृद्ध केलें पाहिजे. बाह्य भौतिक जीवन आणि व्यक्तीचें आंतरिक जीवन यांच्यांतील तफावत भरून काढली पाहिजे. जीवन भौतिक दृष्टीने अजून कितीतरी समृद्ध केलें पाहिजे. कारण असें झालें, तरच कलेची कदर करणारे पुढे येतील. " पिपासितै: काव्यरसो न पीयते-" असें सुभाषित आहेच. पण त्याचबरोबर व्यक्तीच्या आंतरिक जीवनाच्या गरजा लक्ष्यांत घेऊन त्या शमविण्यासाठी योग्य साधनें उपलब्ध करून दिलीं पाहिजेत. उद्योगधंदे व मोठालीं शहरें यांचें विकेंद्रीकरण, सहजीवनाला अधिक वाव, आत्माविष्कारासाठी Community Centres सारखीं समाजघरें व कलाकेंद्रें आणि या सर्वांसाठी भौतिक सुखसोयींचा पूर्ण उपयोग करून व्यक्तीला जीवनाच्या वाढीला अवश्य असणारी ' फावती ' (Leisure) प्राप्त करून देणें हीं खरोखर आज अधिक महत्त्वाचीं कामें आहेत. कलेच्या नांवाखाली भलतेच वाद माजवून, काय, कोणी व कसें लिहावें–याबद्दल दंडक घालून, कलेची आणि समाजाची हानि करण्यापेक्षा, हीं कामें जर आधी हातीं घेतलीं, तर तें सर्व दृष्टीनीच हितावह होणार आहे. कलेवर बंधनें घालून समाजाचें आरोग्य सुधारूं पहाणें यासारखा हास्यास्पद खटाटोप दुसरा नाही ! त्याच्या मुळाशीं स्वत:च्या अगतिकपणामुळे आलेली ' सॅडिस्टिक ' प्रवृत्ति असते. जीवनाच्या विशाल क्षेत्रांत पराक्रम करून दाखविण्यापेक्षा दुसऱ्याचें सुख हिरावून घेण्याची उत्कट इच्छा अधिक असते. या सर्व नियंत्रणवाद्यांना माझें एकच निक्षून सांगणें आहे: " आधी जीवनांतील बाकीचे सर्व प्रश्न सोडवा आणि मग कलेच्या वाटेला जा. हे बाकीचे प्रश्न सोडवितांना तुम्ही कामाला आलां, तर तुमच्या देहाचें सार्थक होईल. आणि, ते सोडवून जर तुम्ही यशस्वी झालां, तर विशाल जीवनाच्या अनुभवाने कलेकडे पहाण्याची तुमची दृष्टीच पार बदलून जाईल. "

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रेबेका

शरच्चंद्र टोंगो, बी. ए.

• सुप्रसिद्ध लेखिका Daphne du Maurier यांच्या 'Rebecca' जगप्रसिद्ध कादंबरीचा हा कथारूप संक्षेप रा. टोंगो यांनी अतिशय कौशल्याने तयार केला आहे, तो वाचकांस खास आवडेल. 'रेबेका' कादंबरीवर आधारलेला चित्रपटहि खूपच गाजला आहे.

★

काल रात्रीं मला स्वप्न पडलं, मी मॅंडेर्लेला परत गेलें. खिडक्यांतून प्रकाश पाझरला असेल, रात्रीच्या हवेनं पडदे थरारतील, अन् वाचनालयाचं दार तसंच अर्धवट उघडें असेल. जॅस्पर कुत्रा जमिनीवर ताणून पडला असेल ········· खरं म्हणजे मी शेकडो मैल दूर होतें. इतर झोपणाऱ्यांसारखं मलाहि कळत होतं, मला स्वप्न पडलं.

आताशा तो अचानक चिंताक्रांत नि गोंधळलेला दिसतो, सिगारेटीमागून सिगारेटी ओढतो, अन् त्या विझवण्याची काळजी तो घेत नाही. तीं तेजस्वी टोकं त्याच्या सभोवतीं पाकळ्यांसारखीं पसरलीं असतात. आम्ही दोघांनी भीति, एकाकीपणा नि फार मोठा आघात सोसला आहे.

मिसेस डॅनव्हर्स ! काय करीत असेल बरं ती ? ती नि फॅवेल. पण मॅण्डेर्ले आतां उरलं कुठे ? एखाद्या रिकाम्या शिंपल्यासारखं तें गर्द झाडींत पडलं आहे.

* * *

मॉंटे कार्लोला मी मिसेस व्हॅन हॉपर बरोबर जेवत होतें. आमच्या शेजारच्या मेजाशीं कुणीतरी येऊन बसला. हॉटेलच्या परिचारकानं खास पाहुण्यांसाठी राखून ठेवलेली अदब त्याला दाखवली. मिसेस व्हॅन हॉपर केवढ्या तरी मोठ्यानं म्हणाली, 'हा मॅक्स डि विंटर, मॅंडेर्लेचा मालक. असं म्हणतात की, पत्नीच्या मृत्यूतून तो अद्याप सावरला नाही.'

प्रसिद्ध प्रवाशांशीं आपली ओळख आहे, हें दाखविण्याचा तिला छंद होता. लेखक किंवा कलावंत तर सोडाच, परंतु ज्यांचीं नांव छापून येतात अशा कोणत्याहि सामान्य मनुष्याशीं परिचय करून घेण्याची तिला हौस होती, अन् तिनं एकदा तसं ठरवलं की, तिचा हल्ला मोठा बिकट असे. तिनं मला एक पत्र आणायला पाठवलं अन् मी परत आलें, तेव्हा ती त्या अनोळखी इसमाशीं बोलत होती. ती मला म्हणाली, 'मि. डि विंटर आपल्या बरोबर कॉफी घेताहेत.'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" माफ करा. खरं म्हणजे आपण दोघी माझ्या बरोबर कॉफी घेणार आहांत."

' असं म्हणतात की मॅंडेलें म्हणजे परिस्थान आहे' त्याच्या दोन भिवयांच्या मधोमध एक वळी दिसली. दुसरे दिवशीं मिसेस् व्हॅन हॉपर इन्फ्ल्युएन्झानं आजारी झाली. जेवायच्या दिवाणखान्यांत मी एकटीच होतें. तो तेथे होताच.

' मैत्रिण दिसत नाही ? काय झालं ?'

मी त्याला तिच्या आजारीपणाबद्दल सांगितलं. ' मैत्रीण वयानं बरीच आहे. नात्यांत आहे का ?' ' नाही. ती माझी मालकीण आहे. मी मैत्रिण ह्या नात्यानें राहतें खरी, पण पगार घेऊन. ' मी म्हणालें.

' मैत्री अशी विकत घेतां येणं कसं शक्य आहे ! ही रानटी कल्पना आहे. पण असं करायचं कारण काय ?'

' मला वर्षाचे ९० पौंड ती देते, अन् माझ्या दृष्टीनं ही फार मोठी रक्कम आहे.'

' कुणी नातेवाईक नाही ! '

' नाही. मला नात्याचं कुणीच नाही. '

' आपल्या दोघांत ही गोष्ट समान आहे. आपण एकटें आहोंत. तशी मला बहीण आहे, पुरातन अशी आजीहि आहे, पण आम्ही एकमेकांना फारसें भेटत नाही. '

मी म्हणालें, ' तुमच्यांत नि माझ्यांत एक मोठा फरक आहे. तुम्हाला घर आहे, मला नाही. '

तो गंभीर झालेला दिसला.

मी भीत भीतच सांगितलं, मला चित्रं काढायला जायचं होतं. माझ्या इच्छेच्या विरुद्ध त्यानं मला आपल्या गाडींतून नेलं. बराच वेळपर्यंत मी चित्रं काढत बसलें. आम्ही परतलों, तेव्हा दिवस मावळला होता. गाडीच्या एका कप्प्यांत मी माझे हातमोजे ठेवले होते, ते मीं काढले, तेव्हा मला त्यांत एक पुस्तक आढळलं.

तो म्हणाला, ' पाहिजे असेल, तर घे. '

का कुणास ठाऊक, पण मला वाटलं, त्याच्या मालकीची एखादी वस्तू आपल्याजवळ असावी...हॉटेलमध्ये आल्यानंतर मीं तें पुस्तक उघडलं. तिरप्या अक्षरांत सुरवातीलाच लिहिलं होतं, ' मॅक्स—रेबेकाकडून. ' मीं तें पुस्तक चटदिशीं बंद केलें.

त्यानंतर मी रोज सकाळीं त्याच्या गाडींतून फिरायला जाऊं लागलें. एके दिवशी मी त्याला सहज विचारलं, ' तुम्ही मला रोज गाडींतून नेता, ह्याचं कारण काय ! तुम्ही दयाळू आहांत, हें तर उघडच दिसतं, पण दानधर्मासाठी तुम्ही माझीच निवड का करावी !

' कारण तूं स्त्रियांच्या शिष्ट वर्गांतली नाहीस. शिवाय तूं वयानं एवढी लहान आहेस की, तुझ्याशीं कसं वागावं, तेंहि कळत नाही. '

मिसेस् व्हॅन हॉपर दुरुस्त झाल्यानंतर अचानक तिला न्यूयॉर्कला जाण्याचं काम पडलं. खरं म्हणजे, हें गांव सोडून जाण्याचा विचारच मला एखाद्या तुरुंगासारखा वाटत होता. मी इकडे न्यूयॉर्कला जाईन, अन् तो तिकडे मॅंडेलेला जाईल.

 मी दिवसभर सामानाची आवराआवर करीत होतें. तो कुठे तरी गेला होता, अन्

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यरात्रीपर्यंत वापस येणार नव्हता. मला आठवतं, मी त्या रात्रीं रडलें. तारुण्यांतलीं आसवं आज येणं शक्य नाही; एकविसावं उलटल्यानंतर उशीतलं खोल रडणं दुर्मिळ होतं!

सकाळीं आम्हाला निघायचं होतं. तो रात्रीच परत आला असेल, असं वाटून मीं दार ठोठावलं. तो परत आला होता. त्यानं मला विचारलं, 'काय हवं तुला?'

'मी तुमचा निरोप घ्यायला आलें आहे. आम्ही आता निघालोंच.'

त्यानं माझ्याकडे टक लावून पाहिलं, अन् म्हणाला, 'दार बंद कर.' त्याला मीं सविस्तर सांगितलं. माझ्या मालकिणीची मुलगी न्यूयॉर्कला चालली होती, म्हणून आम्ही पण तिच्या बरोबर चाललों होतों.

'तिचं ठीक आहे, पण तूं का जातेस?'

'मला ती पैसे देते. ही नोकरी सोडून माझं कसं चालेल?'

'मिसेस व्हॅन हॉपर अमेरिकेला चालली; मी मँडेर्लेला परत चाललों. तुला कुठं जावंसं वाटतं?'

'भलतीच थट्टा करूं नका.'—मी म्हणालें.

'थट्टा कशाची! कुठं जायचं तें तुझं तूंच ठरव. मिसेस व्हॅन हॉपरबरोबर न्यूयॉर्क की, माझ्याबरोबर मँडेर्ले?...'

'तुम्ही चिटणीस म्हणून मला नेणार?'

'नाही. मूर्ख पोरी, माझी इच्छा आहे तूं माझ्याशीं लग्न करावंस. ह्या क्षणाला सुचलं, म्हणून मी विचारीत नाही. सांग मग; तूं तयार आहेस?'

खरं म्हणजे, लग्नाचा विषय असा अचानक निघाल्यामुळे मी घाबरून गेलें. मला तें खरंच वाटेना. पुस्तकांत माणसं गुडघे टेकवून स्त्रियांना चांदण्यांत विनवितात.

'मला वाटलं, तुझं माझ्यावर प्रेम असेल.'

'खरंच, माझं तुमच्यावर प्रेम आहे' मी म्हणालें.

'मग ठरलं तर, मिसेस् व्हॅन हॉपरला कुणी सांगायचं? तूं की मी?'

'तुम्हीच सांगा······माझ्यावर ती रागावेल!'

माझी कल्पना खरी ठरली. ह्या बातमीचा तिला धक्का बसला. त्यानं तिला सांगितल्यानंतर मी तिला भेटायला गेलें. कडवट नि कठोर स्वरांत ती म्हणाली, 'शांत दिसणारं पाणी बरंच खोल होतं म्हणायचं! त्याचं वय काय?'

'बेचाळीस'

मग एखाद्या मैत्रिणीनं विचारावं, तसं तिनं मला विचारलं, 'एखादी वावगी गोष्ट तर तुझ्या हातून घडली नाही ना?'

'तुम्ही काय म्हणतां, तेंच मला समजत नाही.'

'ठीक आहे...पण मला मात्र मनापासून वाटतं की, तूं चूक करतेस. एक विसरूं नकोस. त्याचं तुझ्यावर प्रेम जडलं, म्हणून तो तुझ्याशीं लग्न करीत नाही. खरी गोष्ट हीच की, त्या विशाल घरांतल्या एकटेपणाचा त्याला मनस्वी कंटाळा आला आहे.

* * *

आमचं लग्न झाल्यानंतर सुमारे सात आठवडे आम्ही बाहेर घालवले. नंतर एके दिवशीं मी प्रथमच मॅक्झिमबरोबर लंडनहून मँडेर्लेकडे जायला निघालें. वाटेंत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मॅक्झिम म्हणाला, ' आता फक्त दोनच मैल. टेकडीच्या माथ्यावर दरीकडे झुकलेला तो झाडीचा पट्टा दिसतो ना, त्यांतच आपलं मँडेर्ले आहे. त्याच्या पलिकडे समुद्र. '

आमच्या स्वागतासाठी सगळा नोकरवर्ग समोर आला. सगळ्यांशीं माझा परिचय करून दिला. मिसेस डॅनव्हर्सहि त्यांत होती. तिच्याशी मी हस्तांदोलन केलं, तेव्हा तिचा हात कसा गार नि निर्जीव वाटला ! माझ्या स्वागताचे तिचे शब्दहि असेच गार नि निर्जीव होते. तिच्या मुखावरचं तिरस्काराचं हास्यहि मी ओळखलं.

मँडेर्ले हा फार पुरातन काळीं मेजवान्यांसाठी अन् त्या निमित्त होणाऱ्या संमेलनासाठी बांधलेला भव्य प्रासाद होता. आठवड्यांतून एकदांच तो बाहेरच्या पाहुण्यांना आजहि दाखवण्यांत येई. वाचनालयाच्या भव्य दिवाणखान्यांत एक विशिष्ट वास होता. शांतपणानं तेथील एका खुर्चीत बसून मी स्वत:ला सांगूं लागलें, ' हें सगळं कांही माझं आहे. छतापर्यंत पोंचलेले पुस्तकांचे ढीग, भिंतीवरचीं चित्रं, बगीचे, रानं, सगळं सगळं कांही.'

मॅक्झिमची पहिली पत्नी पश्चिमेकडचा भाग वापरत असे. परंतु माझ्यासाठी पूर्वेकडच्या खोल्यांची योजना केली होती. त्या खास तयार करून घेतल्या होत्या. माझ्या खोल्यांतून गुलाबाची बाग दिसायची, पण समुद्र दिसत नव्हता. फार काय, एवढा जवळ असूनहि माझ्या खोल्यांत त्याचा आवाज सुद्धा ऐकायला येत नव्हता ! मिसेस् डॅनव्हर्सनं माझ्या खोल्या मला दाखवल्यानंतर आपले हात अंगावरच्या काळ्या वस्त्रांत झाकून तेथेच ती उभी राहिली. मी मोठ्या घराण्यांतून आलें नाही. तेव्हा मिसेस डॅनव्हर्ससारखीला माझ्याबद्दल घृणा वाटावी हें साहजिकच होतं. रेबेका होती तेव्हापासून ती हें घर सांभाळत होती. तिला जिंकण्यासाठी मी म्हणालें, ' खरंच, ही खोली मला फार आवडली. ही खोली किती सुंदर सजविली तुम्ही ! '

त्यावर ती हसली नाही. फक्त एवढेंच म्हणाली, ' मी मालकानं दिलेल्या हुकुमाप्रमाणें सगळं कांही केलं. '

त्या दिवशीं रात्रीं जेवण झाल्यावर आम्ही दोघे दिवाणखान्यांत बसलों. थंडी थोडी अधिकच होती. मी ' जॅस्पर 'च्या मऊ कानाशीं खेळत असतां मला एकदम वाटलं की, मी इथ कांही पहिलीच नाही. मी रेबेकाच्या खुर्चीत बसलें होतें अन् रेबेकाच्याच उशीशीं टेकलें होतें.

मँडेर्लेचं काम दिवसभर पुरणारं होतं. तिथली शिस्त नि टापटीप आखलेली होती. माझी नणंद बेट्रीस नि तिचे यजमान एके दिवशीं आम्हाला भेटायला आले. ती फार बडबडी होती. अन् तिला जें वाटतं तें ती सरळ तोंडावर सांगते. अशी तिची प्रसिद्धी मला मॅक्झिमनंच सांगितली होती. ती, तिचा नवरा अन् आमच्या मालमत्तेचा दलाल फ्रॅंक क्राऊले असे तिघेजण भेटायला आले, तेव्हा माझी छाती धडधडूं लागली. मॅक्झिमनं माझा सगळ्यांशीं परिचय करून दिला. बेट्रिस म्हणाली, ' माझ्या कल्पनेपेक्षा फारच वेगळी आहे ही. तुझ्या वर्णनाप्रमाणें नाही. '

दिवसभर ही मंडळी आमच्याकडेच राहिली. निरोप घेतांना ती मला म्हणाली, ' माफ कर हं. मी सारखी बडबडत होतें. पण खरं म्हणजे रेबेकाच्या तुलनेनं तूं किती तरी वेगळी आहेस. '

आठवड्यांमागून आठवडे गेले. आजूबाजूची मंडळी मला भेटायला येऊं लागली, अन् मीहि पण त्यांच्याकडे जाऊं लागलें. मीं पाहिलं, ते सगळे माझी

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तुलना रेबेकाशीं करीत. एकदा 'जॅस्पर'च्या मागे मागे मी किनाऱ्यावर गेलें. तिथं एक झोपडी होती, पण आतलं सामान मात्र जसंच्या तसंच होतं. रेबेका वारली, पण तिच्या सामानाला कुणीच हात लावला नाही. ती म्हणे इथंच चांदण्या रात्रीं आपल्या मित्रमंडळीला जेवणं द्यायची. तिची बोट तिथंच खुंटवून असायची. फ्रँक क्राऊलेनं मला सांगितलं, 'रेबेका ह्याच बोटींत बुडाली.' बोट तळाला गेली, अन् तिचं प्रेत सापडलं, तें मात्र चाळीस मैल दूर, अन् सापडलं दोन महिन्यांनंतर! खुद्द मॅक्झिमनं तें प्रेत ओळखलं. फ्रँकला मी आवडत होतें. त्याला वाटत होतं, मी मॅक्झिमला योग्य आहे. मीं त्याला विचारलं, 'मला एवढेंच सांगा, रेबेका अतिशय सुंदर होती का?'

माझ्यावरची दृष्टि वळवून तो म्हणाला, 'होय. मी माझ्या आयुष्यांत अशी सुंदर स्त्री पाहिली नाही.'

मला स्वत:ला सुखी व्हायचं होतं, मॅक्झिमला सुखी करायचं होतं. इच्छा होती, आम्ही दोघांनीहि एकत्रच रहावं. पण माझ्या सभोंवती रेबेका अशी होती की, मला स्वत:लाच एखाद्या पाहुण्यासारखं वाटत होतं! खोटं नाही; एखाद्या पाहुण्यासारखी मालकीण परत येण्याची मी वाट पहात होतें! सगळे नोकर वारंवार मला सांगायचे, 'रेबेका असं बोलायची, अशी रहायची, असं करायची, अशी वागायची' ...अन् मिसेस डॅनव्हर्स! —ती तर त्या मृत स्त्रीची नि:सीम भक्त दिसली. फार काय, मॅक्झिम विचार करतांना दिसला की मला वाटत असे, हा रेबेकाचा विचार करून राहिला आहे... रेबेकाचा...!

एके दिवशीं मॅक्झिम लंडनला आपल्या कांही मित्रांकडे गेला. त्याच दिवशीं मिसेस डॅनव्हर्सला भेटायला एक इसम आला. त्याच्या शरीरासारखेच त्याचे केस लाल बुंद होते. दिसायला तो देखणा होता. तो माझ्याशीं बोलला, तेव्हा ओळखलं, त्याच्या श्वासोच्छ्वासाला व्हिस्कीचा वास होता. त्याचं नांव फॅवेल. घरांतले सगळे नोकर कुठेतरी बाहेर गेले होते. त्यानं मला विचारलं 'मॅक्स कुठे गेला?'

'लंडनला.'

'तुम्हाला एकटंच सोडून? तो नाही, असं पाहून कुणी तुम्हाला पळवून नेलं तर...'

त्याच्याशीं बोलत बसण्यांत मला विशेष अर्थ दिसला नाही. मी जाऊं लागलें तेव्हा तो म्हणाला, 'मी आल्याचं मॅक्सला कळूं देऊं नका. काय!'

अस्सं! म्हणजे मॅक्झिम लंडनला गेला, हें पाहून मिसेस डॅनव्हर्सनं त्याला बोलावलं होतं तर...पण हा फॅवेल कोण!

मँडेलेंचा पूर्वेकडचा भाग मी वापरीत होतें, अन् पश्चिमेकडचा भाग माझ्या अगोदरच रेबेका वापरीत होती. मला वाटलं, त्या भागांत आता धूळ साचली असेल, सामान अस्ताव्यस्त पडलं असेल. त्या भागांत मी प्रथम आजच गेलें. पण केवढें आश्चर्य! जणू कांही, आजहि रेबेका तेथे राहते, अशासारखं तिचं सगळं सामान नीटनेटकं होतं. तिची वस्त्रं, तिचे जोडे, कंगवे, ब्रश–सगळं कांही जिथल्या तिथं होतं. मी मागे वळून पाहिलं.

सायंकाळच्या मंद प्रकाशांत मिसेस डॅनव्हर्स माझ्यामागं वळून उभी होती!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'तुम्हाला हा भाग पाहायचा होता, तर मला का नाही सांगितलं? पाहा सगळ्या मँडेलेंत अशी दुसरी सुंदर खोली नाही. ही तिची शय्या. तिच्या आवडीचं सोनेरी आच्छादन आजहि मी तिथंच ठेवतें. हा तिचा झगा ''' तुमच्यापेक्षा ती किती तरी उंच होती. ती सडपातळ होती. तिच्या गर्द केसांचं तिच्या मुखाला सुंदर वलय शोभून दिसत असे. हे तिचे ब्रश ''' तिचे केस कमरेच्या खालीं येत, अन् दोन हातांत दोन ब्रश घेऊन मालक तिचे केस विंचरून देत. कोणताहि पोशाख असला, तरी ती कशी सुंदर दिसायची '''''' पण तिच्या प्रेतावर एकहि वस्त्र नव्हतं '''''' ह्या खोल्यांची मी अशी काळजी घेतें की, तुम्हाला वाटेल, ती कुठे बाहेर गेली अन् आता परत येईल—'

मी माझ्या शय्येवर जाऊन पडलें, तेव्हा कमालीची थकलें होतें. मला मात्र हें कळत नव्हतं की, तिच्या खोल्यांची नि सामानाची काळजी मॅक्झिमच्या हुकुमावरूनच घेतली जाते की काय! खरंच का तो तिच्या ब्रशांना आता सुद्धा स्पर्श करीत असेल, अन् तिच्या वस्त्रांत हात घालून उदासवाणा होत असेल?

तो रविवार होता. दुपारीं आमच्या मित्रमंडळीच्या टोळ्यांवर टोळ्या येऊं लागल्या, अन् त्यांचं आदरातिथ्य करतां करतां आमची एकच धांदल उडाली. ह्या मंडळीला माझ्या लग्नाला हजर राहतां आलं नाही, अन् ही उणीव थोडी फार भरून काढण्याचा मार्ग त्यांनी सुचवला. तो म्हणजे माझ्या सन्मानार्थ 'फॅन्सी ड्रेस बॉल' मँडेलेंत व्हावा. माझी किंवा मॅक्झिमची ह्या योजनेला हरकत नव्हती, पण प्रश्न होता, ह्या नृत्याचा सगळा व्याप अंगावर कुणी घ्यायचा? पण फ्रँक क्राऊली पुढे आला, अन् सगळी व्यवस्था पाहायला तो तयार झाला. ठरलं. मँडेलेचा जुना आनंद नव्यानं लुटायला ती मंडळी उत्सुक होती. लवकरच ह्या नृत्याची बातमी सर्वदूर पसरली. ह्या नृत्याच्या वेळीं मी कोणता पोषाख करावा, तें मात्र मला सुचेना. माझी एवढीच इच्छा होती, माझ्या वेषाचा पत्ता शेवटच्या क्षणापावेतों मॅक्झिमला किंवा फ्रँकला लागूं नये. मिसेस् डॅनव्हर्सनंच मला एक वेष सुचवला, अन् तो मला आवडला. मॅक्झिमच्या नात्यांतल्या अतिशय देखण्या स्त्रीचा तो पोशाख होता. तिचं चित्र आमच्या संग्रहीं होतं, अन् त्यावरून मिसेस् डॅनव्हर्सनंच सुचवलेल्या लंडनच्या एका शिंप्याकडे मी तो शिवायला टाकला.

त्या दिवशीं धुकं फार पडलं होतं, अन् आकाश भरून आलं होतं. नोकर बिचारे एकसारखे कामाला जुंपले होते. माझा वेष ऐन वेळेवर येऊन पोचला. मॅक्झिमनं, फ्रँकनं नि बेट्रीसनं मला विचारलं, पण मी माझ्या वेषाचा गौप्यस्फोट अखेरच्या क्षणापर्यंत करणार नव्हतें!

आजचं नृत्य माझ्या सन्मानार्थ होतं '''''' गॅलरींत बँड वाजत होता. मी ज्या वेषांत आज नृत्य करणार होतें, त्या नांवाचा पुकार झाला, अन् मी पायऱ्यांच्या माथ्यावर हसत हसत येऊन उभी राहिलें. मला वाटलं, माझा हा पांढराशुभ्र वेष मॅक्झिमला आवडल्याशिवाय राहणार नाही. पण अरे!''' खाली मॅक्झिम पांढरा फिक्कट पडला होता!

तो ओरडून म्हणाला, 'जा. साधा झगा घालून ये, पण हा पोशाख नको''''''जा, एकदम जा.'

मिसेस् डॅनव्हर्स माझ्याकडे पाहून हसत होती. तिच्या मुखावर विजयाचे खुनशी भाव तरळले. धावत धावत मी माझ्या खोलींत गेलें अन् मी अंग टाकलं. बेट्रीसनं मला सांगितलं, 'शेवटच्या नृत्याच्या वेळीं रेबेकानं सुद्धा हाच पोशाख केला होता!'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रेबेका ······ सदैव रेबेकाच ! माझं हें लग्न अयशस्वी ठरलं होतं. तो अद्याप रेबेकावरच प्रेम करतो; तिला तो विसरूं शकत नाही. त्या मँडेर्लेत जिथं माझीं पावलं उमटलीं, जिथं मी वसलें, तेथे मला दुसरं कुणीच भेटलं नाही. फक्त रेबेका ! ती अद्याप जिवंतच आहे, अन् खरं म्हणजे, मला येथून नाहीसं व्हायला पाहिजे !

नृत्याच्या दुसरें दिवशीं दुपारीं तीन वाजून गेले, तरी मॅक्झिमचा पत्ता नव्हता. धुकं वाढलं होतं, अन् झाडांच्या माथ्याकडे वर सरकत चाललं होतं. आमच्या खाडींत एक जहाज येऊन उभं राहिलं, अन् त्याचा कप्तान मला भेटायला आला. त्यानं अशी विचित्र गोष्ट सांगितली की, मी विस्मयचकित झालें ! त्याच्या जहाजाच्या बुडाला कांही दुरुस्ती हवी होती, म्हणून त्यानं आपला पाणबुड्या आंत सोडला, अन् त्याला समुद्राच्या तळाशीं रेबेकाची छोटी बोट आढळली.

'पण एवढेंच नाही,' जहाजाचा कप्तान सांगत होता; 'त्या छोट्या बोटी-भोवती माझ्या माणसानं चाचपलं. केबीनचीं दारं घट्ट बंद होतीं. प्रयत्न करून तो आंत घुसला, अन् त्यानं तिथं एक विलक्षण चमत्कारिक गोष्ट पाहिली...त्याला आंत एक प्रेत दिसलं.'

'आश्चर्य आहे ! कारण मी असं ऐकलं की, अपघाताच्या वेळीं रेबेका एकटीच आपल्या बोटींत होती. तिच्या बरोबर मग दुसरं कुणी तरी असेल... पण असं कसं ?—ती कित्येक मैल दूर सांपडावी, अन् दुसरा मात्र तिथंच रहावा...'

मी विचार करीत होतें...रेबेकाची बोट नि तिचा मृत सोबती... कोण असेल बरं ? एवढ्यांत मॅक्झिम आलाच. मला सांगितलेली माहिती जहाजाचा कप्तान त्याला सांगणार ! मी मग उठून बाहेर गेलें !

माझं मन कसं व्याकुळ नि अस्थिर झालं होतं. पण ही वेळच अशी होती की, मी मलाच सावरायला पाहिजे. ह्या क्षणीं मी स्वत:ला सावरूं शकलें नाही, तर जन्मभर कधीच सावरणार नाही. तें मला कळत होतं. खरंच, गेल्या चोवीस तासांत मी एकदमच वयानं वाढलें !

दार उघडून मी आंत गेलें, तेव्हा मॅक्झिम एकटाच पाठमोरा उभा होता. मी त्याच्या थंडगार ओठांचं चुंबन घेतलं. मी म्हणालें, 'मला फार फार वाईट वाटतं. तुझ्या दु:खांत मला सहभागी व्हायचं आहे. तूं माझ्यावर प्रेम करावंस, असं मी मागत नाही; अशक्य गोष्टी मला नकोतच. तूं आपल्या एखाद्या मित्रासारखं जरी मला मानलंस, तरी मी स्वत:ला धन्य समजेन.'

माझं मुख त्यानं दोनहि हातांत घेतलं.

'नाही, लाडके, फार उशीर झाला. सुखाची थोडीफार संधी आपण कायमची गमावली !'

'नाही, मॅक्झिम, असं म्हणूं नकोस.'

'आता तुझ्या माझ्यासाठी सुख नाही. रेबेकानं जिंकलं ··· मृत्यूपूर्वीचं तिचं तें मंद, धोकेबाज हास्य मला आठवतं. त्याहि वेळीं तिला वाटत असलं पाहिजे, 'शेवटीं आपणच जिंकणार'··· जिला रेबेका म्हणून पुरलं, ती रेबेका नाही. रेबेका आपल्या बोटींत एकटीच होती, अन् तिचंच तें प्रेत आहे. नीट ऐक, रेबेका अपघातानं बुडून मेली नाही ··· तिला मीं गोळी घालून मारलं ! बोटींत तिचं प्रेत घालून मी ती बोट बुडवली··· आता सांग, खरंच तुझं माझ्यावर प्रेम आहे का ?'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

चहूंभोंवती अतिशय शांत होतं. 'जॅस्पर' आपले पाय चाटत होता त्याचा आवाज होत होता. एखादा भयंकर धक्का बसला, म्हणजे प्रथम तो जाणवत नसतो. मला आठवतं, त्या वेळीं माझ्या मनांत कोणतीच भावना नव्हती; ना दुःख, ना भय!

'आता पुढे काय होणार?'

'तिचं प्रेत ओळखलं जाईल. तुला वाटत असेल, माझं रेबेकावर प्रेम होतं, अन् म्हणून मी तिला गोळी घालून ठार मारलं—नाही, तसं नाही, ती व्यसनी नि बदमाष होती. ती कमालीची बुद्धिमान्, दयाळू नि उदार स्त्री होती. लग्न झाल्या-नंतर लोक म्हणूं लागले, मी मोठा दैववान आहे. पण लग्न झाल्यानंतर पाचच दिवसांनी तिनं माझ्याशी सौदा केला! माझं मँडेर्लेवर मनापासून प्रेम आहे. तिनं मँडेर्लेची कीर्ति दूरवर पोंचवायची, जगाच्या दृष्टीनं आमचं लग्न हें त्या शतकाचं यशस्वी लग्न दाखवायचं, अन् ह्याच्या मोबदल्यांत मीं काय द्यायचं, तर मुभता—तिच्या वैयक्तिक आचरणाबद्दल! मँडेर्लेंत एखादा समारंभ गाजवून खळग्यांतल्या आपल्या बिळांत एखाद्या जनावरानं जावं, तशी ती लंडनला आपल्या फ्लॅटवर जायची. तिचे धंदे मी मँडेर्लेसाठी सहन केले. फ्रँक क्राऊलेच्या सुद्धा ती मागे होती. तिचा एक नातेवाईक होता फॅवेल…'.

'कोण?'—मी विचारलं,

'फॅवेल! जॅक फॅवेल त्याचं नांव. त्याच्याबरोबर ती इथं मँडेर्लेंत रात्र रात्र घालवूं लागली. आताशा ती थोडी फिक्कट दिसत होती. तिला मीं सूचना दिली. माझ्या दृष्टीसमोर मी हें सारं कसं सहन करणार? एके दिवशीं ती लंडनला गेली, अन् तेथे न थांबतांच ती लगेच परत आली. ती आपल्या झोपडींत बसली होती; तेथे मी गेलों.

हें पाहा, तूं त्या फॅवेलबरोबर लंडनला कांहीहि कर. मँडेर्लेचा संबंध नको. आपल्या कराराच्या हें विरुद्ध आहे.'

आज तर ती मला खूपच फिकी नि रोड दिसली. छद्मीपणानं हसून ती मला म्हणाली, 'मॅक्स, मला जर मूल झालं, तर कुणी असं सिद्ध करूं शकेल काय की, तें तुझं नाही! तें इथंच मँडेर्लेंत वाढेल. तुझ्यामागे मँडेर्लेचा तोच मालक होईल-नाही?'

'तिचे शब्द मला असह्य झाले! मीं तिला गोळी घातली, तेव्हाहि ती हसतच होती. त्यावेळीं मध्यरात्र झाली होती. तिचं प्रेत मीं बोटींत घातलं, तरत्या वलयाच्या सहाय्यानं मी जमिनीला आलों. त्याहि वेळीं मी हें ओळखूनच होतों, असं कधी तरी निश्चित घडून येणार…!

'उद्या ती बोट वर उचलणार आहेत अर्थात् तिचं शरिर पण त्याबरोबरच वर येईल…!'

* * *

पण मॅक्झिमला आपलं म्हणायला मी मोकळी झालें. आता मी 'मी' राहणार नव्हतें; आम्ही दोघे ह्या संकटांतून पार पडणार होतों. दुपारीं जेवण झाल्या-नंतर तो खुर्चीत बसला. मी त्याच्या पायाशी त्याच्या गुडघ्यावर मस्तक टेकवून बसलें. माझ्या केसांत तो हात फिरवीत होता. शांत, स्तब्ध आनंद माझ्या वांट्याला आला. आमच्या दोघांत आता तिसरं होतं कोण!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दुसरे दिवशीं सकाळींच मॅक्झिम तयार झाला. मी अर्थातच घरीं राहिलें- रेबेकाची बोट वर उचलली गेली, अन् डॉक्टर, न्यायाधिश नि पोलीस अधिकारी नियमाप्रमाणे त्याप्रसंगीं बोलावले गेले. त्या छोट्या बोटींतलं प्रेत डॉक्टरनं रेबेकाचंच म्हणून ओळखलंहि. मॅक्झिमनं पाहिलं, प्रेत ओळखलं, तेंहि रेबेकाचं अन् हेंहि रेबेकाचं... ह्या सर्व प्रकरणाची चौकशी होणार होती !

कॉरोनरच्या समोर, जवळच्या एका बाजारच्या गांवीं ही चौकशी झाली. मी, मॅक्झिम नि फ्रँक असे आम्ही गाडींतून गेलों. मी आंत कांही गेलें नाही, गांवातल्या बंद दुकानाकडे पाहात बसलें. पण मग त्यांचाहि कंटाळा आला, अन् मी जिथं प्रत्यक्ष काम चाललं होत, त्या खोलींत गेलें. साक्षी आटोपत आल्या होत्या. रेबेकाची बोट बांधणाऱ्या सुताराने सांगितलं कीं, बोट मजबूत होती, अन् तिच्या तळाला कुणी तरी मुद्दाम भोकं पाडलीं नसतीं, तर तीं बुडण्याचं कांही एक कारण नव्हतं.

पण कोरोनरनं निर्णय दिला, आत्महत्या करून तिला मृत्यू आला.

त्या चौकशीच्या वेळीं पहिल्यापासून आम्ही जसे हजर होतों, तसेच आणखी दोघेजण लक्ष्यपूर्वक चौकशीचं कामकाज पाहत होते. मिसेस् डॅनव्हर्स नि फॅवेल. काम आटोपल्यानंतर सायंकाळीं फॅवेल मँडेर्लेला आला. तो आला, तेव्हा मॅक्झिम कुठे तरी बाहेर गेला होता. त्यानं प्रथम मला व्हिस्की मागवायला सांगितलं.

‘ एक गोष्ट तुम्ही विसरूं नये, ’ तो म्हणाला, ‘ रेबेकाला मी अन्याय होऊं देणार नाही. आत्महत्या ! ... मूर्ख वेटे ! माझं तिच्यावर नि तिचं माझ्यावर केवढं प्रेम होतं...! ’

एवढ्यांत मॅक्झिम आला.

‘ मॅक्स, मी तुझं अभिनंदन करायला आलों. ’

‘ प्रथम तूं चालता हो. ’

‘ शांत हो. ह्या सगळ्या भानगडींतून तूं कसा छान निसटलास ! पण एक विसरूं नकोस, मी मनांत आणलं, तर तुझे हाल कुत्रा खाणार नाही. तुला तर हें माहीतच आहे. आम्ही एकमेकांवर प्रेम करीत होतो. तिनं मला लिहिलेलें हें शेवटचं पत्र पाहा : “ रात्रभर मी झोपडींतच आहे. तुझ्यासाठी दार उघडं ठेवीन. तुला कांही सांगायचं आहे. शक्य तेवढ्या लौकर येऊन भेट ”– रेबेका... सांग मॅक्स, आत्महत्या करणारी बाई असं पत्र कधी तरी पाठवील काय ? मीच दुर्दैवी. त्या रात्रीं मी दुसरीकडे एका खान्यांत गुंतलों होतों अन् दुसरे दिवशीं कळलं, रेबेका बुडून मेली ! तुला काय वाटतं ? हें पत्र जर कोरोनरनं वाचलं, तर काय होईल ! !

‘ मग देत का नाहीस ? ’

‘ शांत हो ! सुंदर स्त्रियांशीं लग्न केलेले सगळेच लोक तुझ्यासारखे मत्सरी असतात ! वृत्तीनं मी समाजवादी आहे. पत्नीला ठार न करतां तिला वाटून टाकली तर काय बिघडतं ! खरं म्हणजे, सुंदर स्त्री जेवढी अधिक वापरावी, तेवढी अधिक सुंदर होते. पहा, मला विशेष नको. सालाचे दोन तीन हजार मिळाले की, मी मजेंत राहीन. ’

‘ प्रथम तूं चालता हो. तुझ्याशी मला बोलायचं नाही. तुझ्यामागेच दरवाजा आहे. कर्नल ज्युल्यान् येथील न्यायाधिश आहे. तुला हवं असेल, तर मी त्याला बोलावून घेतों ’

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'ठीक आहे. तुझी तशी इच्छाच असेल, तर बोलावून घे.'

शांतपणानं मॅक्स फोनवर गेला. मी त्याला थांबवण्याचा प्रयत्न केला. पण त्यानं मानलं नाही.

सगळं कांही निःस्तब्ध होतं. पावसाची अखंड, सावकाश, सरळ नि कंटाळ-वाणी झिमझिम ऐकायला येत होती. ह्या एकाच आवाजानं बाकीचे सगळे आवाज झाकून टाकले! फार काय, कर्नल ज्युल्यानची गाडी थांबली तें सुद्धा कळलं नाही.

कर्नल ज्युल्यानला फॅवेल म्हणाला, 'रेबेकाचा दूरचा भाऊ ह्या नात्यानच नाही, तर ती जगली असती, तर तिचा भावी पति ह्या नात्यानंहि मला बोलण्याचा हक्क आहे. आज कोर्टीत सिद्ध झालं, तिनं आत्महत्या केली. पण त्यापूर्वी कांही तासच तिनं मला पाठवलेलं हें पत्र वाचा, अन् सांगा, आत्महत्या करणारी कोणतीहि स्त्री असं कधी तरी लिहूं शकेल काय!'

कर्नल ज्युल्याननं तें पत्र वाचलं. आश्चर्यानं तो थक्क झाला होता. त्यानं विचा-रलं, 'तुमचं काय मत आहे? काय झालं असावं?'

'तुम्ही मला माझं मत विचारता, तेव्हां मी तें सांगतो. ऐका. रेबेकाचा खून करण्यांत आला ... ! तिचा खुनी येथेंच आहे. हा मॅक्स, फासावर लटकतांना हा फार चांगला दिसेल नाही?'

'तुम्ही ह्यांच्या विरुद्ध फार मोठा आरोप करताहांत. पण तुम्ही तो कसा सिद्ध करणार?'

'अस्सं! म्हणजे तुम्ही सुद्धां ह्याचा हात धरून ह्याला यांतून निभवून नेणार तर ... ! ठीक आहे. मिसेस् डॅनव्हर्सला बोलवून घ्या.'

मिसेस् डॅनव्हर्स आली, पण ती फार थकलेली दिसली. तिला तें पत्र वाचायला दिलं.

'मला ह्या पत्राचा अर्थच समजत नाही. तिची डायरी मी जपून ठेवली आहे तिच्यावरून ह्या पत्राचा कांही अर्थ लागू शकेल तर पाहा..'

कर्नल ज्युलाननं तिला डायरी आणायला सांगितलं. रेबेकाची लाल छोटी डायरी तिनं आणली. कर्नल ज्युलाननं त्या दिवसाचं पान उघडलं, अन् तो वाचूं लागला.

'केस कापणें: बाराला; बाजूला फुली. क्लबमध्ये जेवण; बाजूला फुली. बेकर: दोन वाजतां; बाजूला केवढी मोठी फुली. बस... पण हा बेकर कोण? कुणीहि असला, तरी ती ह्या बेकरला भेटली होती. पैसे उकळणाऱ्या एखाद्या बदमाषाला तर ती भीत नव्हती ना!'

त्यानं फॅवेलकडे पाहिलं.

'भीति अन् तिला?' मिसेस डॅनव्हर्स म्हणाली, 'ती कधीच कुणाला भ्याली नाही. तिला भीति वाटायची फक्त आजारपणाची. एकदा ती मला म्हणाली होती, 'मला झटपट मृत्यु आवडतो, मेणबत्ती विझण्यासारखा झटपट...!' हा पाहा बेकरच्या मागे टेलिफोनचा नंबर आहे.'

 अरे देवा, बेकरचा पत्ता लागायला नको; तो मरून जायला पाहिजे...

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बेकरचा पत्ता लागायला उशीर लागला नाही. तो स्त्रियांच्या रोगांचा तज्ज्ञ होता. त्यावेळीं मॅक्झिमनं प्रथमच माझ्याकडे पाहिलं; त्याचे डोळे माझा निरोप घेत होते.

कर्नल ज्युल्यान म्हणाला, 'एवढी गोष्ट मात्र स्पष्ट दिसते की, डॉ. बेकरनं तिला जें सांगितलं, तेंच ती फॅवेलला सांगणार होती. ठीक आहे, ह्या डॉ. बेकरला तुम्ही भेटायला पाहिजे.'

'पण मॅक्सला एकट्याला जाऊं द्यायला मी तयार नाही.' फॅवेल म्हणाला.

'मग मी जातों बरोबर...'

'मी बरोबर आलों, तर तुमची हरकत नाही ना? हा डॉ. बेकरच माझं म्हणणं सिद्ध करणार आहे.'

दुसरे दिवशीं सकाळीं डॉ. बेकरला लंडनला जाऊन सगळ्यांनी भेटायचं ठरवलं. रात्रभराची हमी घेण्यासाठी मॅक्झिमनं सुचवलं की, आम्हाला बाहेरून बंद करून मिसेस डॅनव्हर्सनं किल्ली स्वत:जवळ ठेवावी. पूर्वी ज्यांनी कधी सुद्धा एकमेकांचं चुंबन घेतलं नाही, अशा अपराधी प्रेमिकांसारखं आम्ही एकमेकांच चुंबन घेतलं—लंडनच्या उत्तर भागांत बेकर नांवाचा एक इसम राहत होता, अन् त्याच्या हातांत आता आमचीं नशिबं होतीं!

मी, मॅक्झिम, कर्नल ज्युल्यान आमच्या गाडींत अन् मागे फॅवेल स्वत:च्या गाडींत असे आम्ही निघालों. कर्नल ज्युल्याननंच आमचा परिचय डॉ. बेकरशीं करून दिला. त्या दिवशीच्या वर्तमानपत्रांत रेबेकाबद्दल दिलेल्या आत्महत्येच्या निर्णयाची बातमी होती. डॉ. बेकरनं ती वाचली होती. कर्नल ज्युल्यान म्हणाला 'पण ह्या फॅवेलचं समाधान या निर्णयानं होत नाही. ज्या दिवशी ती ह्या जगांतून कायमची गेली, त्याच दिवशीं दुपारी दोन वाजतां ती आपल्याला भेटली, असं ह्या डायरीवरून दिसतं...'

त्यानं ती डायरी पाहिली.

'मी आपल्याला माझं रेकॉर्ड पाहून सांगतों.'

डॉ. बेकरनं रेकॉर्ड आणलं.

'पाहा, आपण म्हणता, तें नांव ह्यांत नाही. त्यादिवशीं दुपारीं दोन वाजतां मिसेस डॅनव्हर्स आल्या होत्या.'

'असं! म्हणजे, तिनं खोटं नांव सांगितलं होतं, तर!'

'खरं म्हणजे, आम्ही आमच्या रोग्याबद्दल कांहीसुद्धा सांगणं हें शिष्टाचाराला सोडून आहे. तरी पण आता तुमची पत्नी वारली आहे. तुमची पत्नी अतिशय आजारी होती. मिसेस डॅनव्हर्स हें नांव धारण करणारी तुमची पत्नी मला नीट आठवते...दोन तीन वेळां ती माझ्याकडे आली होती. वरून दिसायला तर ती सुदृढ दिसत होती, पण रोगाचीं बीजं अशीं खोल रुजलीं होतीं कीं, तिला मूल होणं ही अगदी अशक्य गोष्ट होती. तिला सत्य हवं होतं; तिला असत्य चालण्यासारखं नव्हतं. मीं तिला सत्य तेंच सांगितलं. अफु देऊन ऑपरेशन केलं, तरी त्याचा उपयोग झाला नसता! मीं तिला हें त्या दिवशीं सांगितलं, तेव्हा ती म्हणाली, 'बरेच दिवसांपासून मला संशय होता...' तिनं माझी फी दिली, अन् ती निघून गेली.'

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आम्ही बाहेर आल्यानंतर फॅबेलनं विचारलं, ‘कॅन्सर हा स्पर्शजन्य रोग असतो का?’

कुणीच कांही बोललं नाही. तो पुढे म्हणाला, ‘छान...कॅन्सर! आता तर आत्महत्येला हेतूहि मिळाला.

कर्नल ज्यूलानची बहीण लंडनलाच होती; तेथे त्याला सोडलं. मला वाटलं मी कुठे तरी शांत, निःस्तब्ध जागीं विश्रांती घेत आहे. वाटेंत आम्ही एका हॉटेलांत जेवण घेतलं. मॅक्झिम म्हणाला, “स्वित्झर्लंडला कांही दिवसांसाठी आपण जायला पाहिजे... रेबेका मुद्दाम माझ्याशीं खोटं बोलली. त्या दुखण्यांतून सुटका करून घ्यायला मीच तिला ठार मारावं, अशी तिची इच्छा होती...खरं म्हणजे आता सुद्धा जिंकलं रेबेकानंच!’

सगळं कांही संपलं होतं. मॅक्झिमनं गाडी सोडली. रात्रीचे दोन वाजून गेले होते. मँडेर्लेच्या विरुद्ध दिशेनं आम्ही निघालों होतों. आमच्या डाव्या बाजूला नदीची चंदेरी रेषा होती. आकाश गर्द काळं होतं, पण क्षितिजापाशीं मात्र तें रक्तवर्ण होतं!

●

संपादकीय

गोंदियाचें अधिवेशन

विदर्भ-साहित्य-संघाचें अकरावें अधिवेशन डॉ. वि. भि. कोलते यांच्या अध्यक्षतेखालीं गोंदिया येथे ४, ५ व ६ नोव्हेंबर या दिवशीं यशस्वितेने पार पडलें. याच वेळीं वि. सा. संघाचा रौप्यमहोत्सव बिहारचे गव्हर्नर ना. अणे यांच्या अध्यक्षतेखालीं साजरा करण्यांत आला. नामदारसाहेबांच्या हस्तें डॉ. दप्तरी, म. म. घुलेशास्त्री, डॉ. य. खु. देशपांडे, कविभूषण प्रा. खापर्डे व रा. बा. स. गडकरी या पाच ज्येष्ठ व श्रेष्ठ साहित्यिकांचा गौरव करण्यांत आला. त्याचप्रमाणें, डॉ. तु. ज. केदार यांच्या अध्यक्षतेखालीं महाकवि–भवभूति–स्मारक–समारंभहि थाटाने पार पडला. अशा प्रकारें गोंदिया येथे विविध प्रकारचे भरगच्च कार्यक्रम अतिशय यशस्वितेने पार पडले, हें कळून सर्व साहित्यभक्तांस समाधान वाटेल.

डॉ. कोलते यांचें भाषण

डॉ. कोलते यांनी आपल्या भाषणांत दोन मुद्यांवर भर दिला: पहिला मुद्दा मराठीवर हिंदीचें आक्रमण होण्यासंबंधींचा. मराठी मध्यप्रांत व महाकोशल यांच्या सरहद्दीवर मराठीची गळचेपी होत आहे, ही वस्तुस्थिति आहे. तिला पायबंद बसला पाहिजे! हिंदी ही राष्ट्रभाषा होण्यास पात्र असून ती त्या दृष्टीने आपणा सर्वांस प्रिय व पूज्य वाटावयास पाहिजे. पण याचा अर्थ असा नव्हे की, हिंदीने प्रांतभाषांवर कुरघोडी करावी! मराठीसारख्या प्रांतभाषांना विकासास पूर्ण वाव राहूनच हिंदी ही आपणास राष्ट्रभाषा म्हणून हवी. —हें सत्य कित्येकांस कटु वाटेल, पण अशीं कैक कटु सत्यें पचवावयाची वेळ आलेली आहे!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दुसरा मुद्दा संयुक्त महाराष्ट्राचा. संयुक्त महाराष्ट्राला सर्व थोर थोर महाराष्ट्रीय विचारवंतांनी पाठिंबा दिलेला आहे, ही एकच गोष्ट हा प्रश्न निदान महाराष्ट्रीयां पुरता तरी मतभेदातीत असणें कसें आवश्यक आहे, याची साक्ष पटेल! परंतु दुर्दैवाची गोष्ट ही की, संयुक्त महाराष्ट्राला उघड वा प्रच्छन्न विरोध करणारे 'महाभाग' अजून आपल्यांतच आढळून येतात! हा विरोध ज्यांना पोटापाण्याच्या प्रश्नामुळे करावा लागतो, त्यांची अनन्यगतिकता आपण समजूं शकतों; पण तत्वाच्या नांवाखाली —'तत्त्वमसि 'च्या नव्हे! —विरोध करणाऱ्यांची भूमिका मात्र आकलन होण्यासारखी नाही, असें म्हणणें प्राप्त आहे!

हिंद संघाची एकता अभंग राहून संघराज्याचें सामर्थ्य वृद्धिंगत होईल— अशाच धोरणाने भाषावार प्रांतरचना तिच्या पुरस्कर्त्यांस हवी आहे, हें पुन:पुन्हा सांगितलेंच पाहिजे, असें नाही.

दोन अभिनंदनीय गोष्टी

विदर्भ-साहित्य-संघाला मध्यप्रांत-वऱ्हाड-सरकारने एक हजार रुपयांची देणगी दिली आहे, याबद्दल त्या सरकारचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे; आमचें प्रांतिक सरकार संघाकडे नेहमीच आपुलकीने पाहील, अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.

डॉ. कोलते यांस 'महानुभाव तत्वज्ञान' या ग्रंथाबद्दल 'कै. सरस्वतीबाई देशमुख-पारितोषिक' मिळालें, याबद्दल डॉक्टरसाहेब अभिनंदनास पात्र आहेत.

दिवाळी-अंकांचें स्वागत

'युगवाणी' कडे व व्यक्तिश: मजकडे चालू सालचे पुढील दिवाळी-अंक आले आहेत. १ 'साहित्य,' मुंबई; २ 'नवयुग,' मुंबई; ३ 'सत्यकथा,' मुंबई; ४ 'हिंद,' मुंबई; ५ 'चित्रमय जगत्,' पुणें; ६ 'सह्याद्रि,' पुणें; ७ 'किर्लोस्कर,' किर्लोस्करवाडी; ८ 'अभिरुचि' बडोदें; ९ 'स्वदेश' नाशीक; १० 'हिंदुस्थान' उमरावती; ११ 'भवितव्य' नागपूर; १२ 'महाराष्ट्र; नागपूर; १३ 'समाधान,' नागपूर; १४ 'सुषमा,' नागपूर—हे सर्व अंक आपापल्या परीने उत्तम आहेत. प्रत्येक अंकांत कांही तरी वाचनीय मजकूर आहेच. या सर्व दिवाळी-अंकांचें मी स्वागत करतों आणि ते पाठविल्याबद्दल संपादकांचे मन:पुर्वक आभार मानतो.

क्षमस्व!

'युगवाणी 'च्या नोव्हें. च्या म्हणजे 'रौप्यमहोत्सव अंका' साठी स्वीकारलेला बराचसा मजकूर त्या अंकांत येऊं शकला नाही. हा अंक गोंदिया-अधिवेशनापूर्वी प्रसिद्ध होणें अवश्य झाल्यामुळे ३१ आक्टो. पर्यंत जेवढा मजकूर मुद्रित होऊं शकला, तेवढ्याचाच 'रौप्यमहोत्सव-अंक' काढावा लागला! यामुळे अनिच्छेने सुमारें तीस पानांचा मजकूर मागे ठेवावा लागला! या प्रकारामुळे सदर मजकूर निरपेक्ष बुद्धीने धाडणाऱ्या लेखक-मित्रांची जी गैरसोय झाली, तिजबद्दल मी अत्यंत दिलगीर आहे. हे लेलक-मित्र उदार बुद्धीने मला क्षमा करतील, अशी आशा आहे.

वरील शिलकी मजकूर 'युगवाणी' तून क्रमश: येईल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

प्रा. नारायण कृष्ण दिवाणजी
सरचिटणीस,
वि. सा. संघ यांजकडून

विदर्भ साहित्य संमेलन
गोन्दियाच्या अधिवेशनाने
मंजूर केलेले ठराव

ठराव १ लाः—राष्ट्रपिता परमपूज्य महात्मा गांधी यांच्या अमानुष वधामुळे सर्व देशाला जें दुःख झालें आहे त्यांत हें संमेलन सहभागी आहे. आपल्या विश्व-प्रयत्नांनी भारतवर्षाला स्वातंत्र्य संपादन करण्याचा मार्ग महात्माजींनी दाखविला आणि आपल्या आचरणाने आणि प्रतिपादनाने सर्व जगताला एक अमूल्य तत्त्वज्ञान दिलें याबद्दल अखिल राष्ट्र त्यांचे ऋणी आहे. देशी भाषांची अभिवृद्धि होऊन त्यांना देशाच्या राज्यकारभारांत प्रमुख स्थान मिळावें या तत्त्वाचा महात्माजींनी पुरस्कार केल्यामुळे त्या तत्त्वाला प्राधान्य येऊन, तें अमलांत येण्याचा आज प्रसंग प्राप्त झाला आहे, या गोष्टीचा प्रस्तुत संमेलनाच्या कार्यक्षेत्राच्या दृष्टीने विशेष उल्लेख करणें या संमेलनास अवश्य वाटतें. त्यांच्या मृत्यूने झालेली हानी कधीहि भरून निघणारी नाही. तथापि त्यांनी प्रतिपादिलेल्या तत्त्वांचें अवलंबन केल्यास आपलें राष्ट्र इष्ट दिशेने प्रगति करूं शकेल, असा या संमेलनास विश्वास वाटतो.

अध्यक्षांकडून—सर्वानुमतें मंजूर

ठराव २ राः—मराठीच्या साहित्यक्षेत्रांत मूल्यवान कार्य करणारे पुढे निर्दिष्ट केलेले साहित्यिक मागील संमेलनानंतरच्या काळांत निधन पावले. त्यांच्या निधना-बद्दल हें विदर्भ साहित्य संमेलन शोक प्रदर्शित करीत असून, त्यांना सद्गति लाभावी अशी प्रार्थना करीत आहे.– १. साहित्यसम्राट न. चिं. केळकर. २. नाट्याचार्य कृ. प्र. खाडिलकर. ३ नाटककार मा. ना. जोशी. ४ कविवर्य ना. मु. गुप्ते, ५. नाटककार व कादंबरीकार वा. वि. कुलकर्णी ६. डॉ. बा. शि. मुंजे.

अध्यक्षांकडून—सर्वानुमतें मंजूर

ठराव ३ राः—नागपूर विद्यापीठांत मराठी विषय घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी संस्कृतचा एक पेपर घेतलाच पाहिजे अशी सूचना आलेली आहे. या सूचनेमुळे संस्कृतचा अभ्यास तर वाढणार नाहीच; पण मराठी घेणारे विद्यार्थी मात्र कमी होऊन मराठीच्या अभ्यासाची प्रगति थांबेल. म्हणून अशी योजना न करण्याचा ठराव वि. सा. संमेलनाने अकोट येथे केला आहे, तोच हें संमेलन पुनः संमत करून विद्यापीठाकडे पाठवीत आहे.

अध्यक्षांकडून—सर्वानुमतें मंजूर

ठराव ४ थाः—ज्याअर्थी सर्वच विषय विद्यापीठांत मराठींतून शिकवि-ण्यांत येणार आहेत, त्याअर्थी मराठीचा अभ्यास प्रत्येक विद्यार्थ्याने बी. ए. पर्यंत केलाच पाहिजे. म्हणून नागपूर विद्यापीठाने, सर्व विद्यार्थ्यांना मराठीचा अभ्यास बी. ए. पर्यंत आवश्यक करावा.

अध्यक्षांकडून—सर्वानुमतें मंजूर

अनुक्रमणिका
मराठीचा विकासः महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ठराव ५ वा:—सागर विश्वविद्यालयाने स्वतः मराठी विभाग (Department of Marathi) काढून महाकोशलमध्ये मराठी भाषेच्या उच्च अध्ययनाची व्यवस्था केली तीबद्दल विदर्भ साहित्य संघास समाधान वाटतें

अध्यक्षांकडून—सर्वानुमतें मंजूर

ठराव ६ वा:—' मातृभाषा शिक्षणाचें माध्यम ' या तत्त्वानुसार सागर विश्वविद्यालयाने तत्रस्थ बहुसंख्यांकांची हिंदी ही माध्यम म्हणून स्वीकारली हें योग्यच झालें. तथापि या भागांतहि उच्च शिक्षण घेणाऱ्यांत मराठी भाषिकांची संख्या हिंदी भाषिकांच्या खालोखाल असून ती उपेक्षणीय नाही. अशा परिस्थितींत व आपल्या प्रांताचें सांप्रतचें दुभाषी स्वरूप लक्षांत घेऊन, आणि नागपूर विद्यापीठानेहि मराठी व हिंदी या दोन्ही माध्यमांना मान्यता दिली आहे हें लक्षांत घेऊन वैकल्पिक रीतीने मराठी माध्यमाचीहि सवलत सागर विश्वविद्यालयांत ठेवण्यांत यावी.

अध्यक्षांकडून—सर्वानुमतें मंजूर.

ठराव ७ वा. रा. ब. खलतकर यांनी मोडी लिपीच्या पुरस्कारासाठी आणि प्रचारासाठी जे अविश्रांत परिश्रम चालविले आहेत त्याबद्दल हें संमेलन त्यांचें अभिनंदन करतें. त्यांच्या प्रयत्नांना विद्यापीठाने व हायस्कूल बोर्डाने मान्यता दिल्याबद्दल या संमेलनाला समाधान वाटत आहे.

अध्यक्षांकडून—सर्वानुमतें मंजूर

ठराव ८ वा:—भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व नवीन प्रांतरचनेसाठी अवलंबिण्यांत यावे हें आता सर्वमान्य झालें आहे. राजकीयदृष्ट्या या प्रश्नासंबंधांत जे मतभेद उद्भवले आहेत त्यांच्यापासून अलिप्त राहून, मराठी भाषा व मराठी संस्कृति यांचें एकीकरण व संवर्धन करण्याच्या दृष्टीने या प्रश्नाची सोडवणूक शक्य तितक्या लवकर करण्यांत यावी अशी हें संमेलन मध्यवर्ती सरकार व घटनासमिति यांना विनंति करतें

सूचक—रा. प्र. ना. खोडे
अनुमोदक—प्रा. मा ल. व्यवहारे
ठराव सर्वानुमतें मंजूर.

ठराव ९ वा:—नागपूरच नभोवाणी केन्द्र हें त्याची कक्षा लक्षांत घेतां, बहुतांशीं मराठी भाषी प्रदेशाकरिता आहे व असूं शकते ही गोष्ट उघड असतां, त्या केन्द्रामध्ये मराठी भाषेला योग्य तें स्थान देण्यांत येत नाही. याबद्दल हें संमेलन तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. यासंबंधात पुढील सुधारणा ताबडतोब अमलांत आणाव्या अशी या संमेलनाची हिंदुस्थान सरकारच्या नभोवाणी खात्याला कळकळीची विनंती आहे.

१. दर आठवड्याच्या आगामी कार्यक्रमाच्या सूचना व झालेल्या कार्यक्रमांचें सिंहावलोकन मराठीमधून करण्यांत यावें आणि त्यांत सर्व कार्यक्रमांचा व्यवस्थित व प्रामुख्याने उल्लेख करण्यांत यावा.

२. प्रातःस्मरण मराठींतून व्हावें.

३. मराठी कार्यक्रमांचें पूर्वीपासून ठरलेलें शेकडा ५० हें प्रमाण देखील नीटपणें अमलांत येतांना दिसत नाही. तें तर अमलांत यावेंच; पण मराठी कार्यक्रमांची या केन्द्रावर बहुसंख्या असावी.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

४. हवामानासंबंधीचें जें वृत्त दररिवशीं देण्यांत येतें तें मराठींतून दिलें जात नाही, व त्यामुळे शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याचें दिसून येतें. ही गैरसोय दूर व्हावी.

५. स्थानिक बातम्या, निवेदनें इ. मराठींतूनहि देण्यांत याव्वीं.

सूचक:—रा. जी. एस्. सहस्त्रबुद्धे.

अनुमोदक:—रा. ज. रा. जोशी.

ठराव सर्वानुमतें मंजूर.

ठराव १० वा:—भंडारा, बालाघाट, बैतूल, नेमाड व छिंदवाडा या जिल्ह्यांतील मराठी विभागांतील बाद केलेल्या मराठी प्राथमिक शाळा पुन: सुरू करण्यांत याव्या व जेथे पुरेशा शाळा नसतील तेथे नवीन मराठी शाळा उघडण्याची व्यवस्था करण्यांत यावी अशी या संमेलनाची जनपद संस्था, नगरपालिका आणि प्रा. सरकार यांना आग्रहाची मागणी आहे.

सूचक:—रा. पु. य. देशपांडे

अनुमोदक:—रा. डी. जी. लांडगे

ठराव सर्वानुमतें मंजूर

ठराव ११ वा:—नागपूरप्रमाणेच जबलपूर वगैरे ठिकाणीं सरकारी महाविद्यालयांत हिंदी माध्यमाबरोबरच मराठी माध्यमांतून वर्ग सुरू करण्याची व्यवस्था करण्यांत यावी अशी विदर्भ साहित्य संघाची प्रांतिक सरकारला विनंती आहे.

सूचक:—प्रा. श्री. ना. बनहट्टी

अनुमोदक:—रा. डी. जी. लांडगे

ठराव सर्वानुमतें मंजूर

ठराव १२ वा:— आपल्या प्रांतांत 'समाज शिक्षण योजना' सुरू करण्यांत आली आहे. ह्या योजनेच्या सर्व साहित्यांवर विदर्भ साहित्य संघाचा एकेक प्रतिनिधि घेण्यांत यावा आणि संघाचे अध्यक्ष हे अधिकारपरत्वें (Ex-officio) दुसरे प्रतिनिधि म्हणून घ्यावे अशी सूचना हें संमेलन करीत आहे.

अध्यक्षांकडून—सर्वानुमतें मंजूर

ठराव १३ वा:— सुप्रसिद्ध वैदर्भीय कवि भवभुति यांचें जन्मस्थान आमगांव जवळचें पद्मपूर हें आता निश्चित झाल्याकारणाने या संमेलनाची प्रांतिक सरकारला अशी आग्रहाची विनंती आहे की सरकारने त्या कवीच्या कीर्तीला साजेल असें स्मारक पद्मपूर येथे उभारावें.

अध्यक्षांकडून—सर्वानुमतें मंजूर

गोन्दिया येथे भरलेल्या वि. सा. संमेलनाचा अधिकृत वृत्तान्त वि. सा. संघाच्या १९४८ च्या अहवालांत समाविष्ट करण्यांत येऊन, तो अहवाल 'युगवाणी' तून सविस्तर प्रसिद्ध करण्यांत येईल.

30392
दाखल नोंद क्रमांक
दिनांक 10.2.98
3
विदर्भ साहित्य संघ, नागपूर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"युगवाणी" (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रांत वऱ्हाड शाळाखात्याने आपल्या ता. ११-१-४७ च्या ऑर्डर नं. 104|Genl I A
अन्वये 'युगवाणी' मासिकास लायब्ररीसाठी मंजूरी दिली आहे.

एकमेव विक्रेते

ठाकूर आणि कंपनी लिमिटेड,

अमरावती-अकोला-नागपूर

द. ना. ठाकूर यांनी ठाकूर आणि कंपनी लि. च्या महेश्वर मुद्रणालयांत छापून 'युगवाणी' कार्यालय १९। ४२५ मुधोळकर पेठ अमरावती, येथे प्रकाशित केलें.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ